
शनिवार, २० मे २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२५२
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SATURDAY 20 MAY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-252 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5



सध्या कडक उन्हाळा... त्यातच अंगाची लाही लाही करणारी उष्णता असली तरी डोळ्यांना सुखवणारा हा जेजुरी येथील पिंपळवृक्ष लक्ष वेधून घेत आहे. लाल- केसरी पाने जणू निसर्ग रंगपंचमी खेळत आहेत. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

# मान्सून दक्षिण अंदमानच्या समुद्रात

## तीन-चार दिवसात बंगालच्या उपसागरात येणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : नैऋत्य मान्सून आता अंदमान समुद्राच्या काही भागात दाखल झाला आहे अशी माहिती भारतीय हवामान विभागाने दिली आहे. पुढील तीन ते चार दिवसात दक्षिण बंगालच्या उपसागर, अंदमान समुद्र आणि अंदमान, निकोबारच्या आणखी काही भागांमध्ये मान्सून पुढे सरकण्यासाठी परिस्थिती अनुकूल असल्याचीही माहिती देण्यात आली आहे. तर 4 जून रोजी मान्सून केरळात दाखल होणार आहे. साधारण 22 मे रोजी मान्सून हा अंदमानात दाखल होत असतो, या वर्षी मात्र तीन दिवस आधीच हा मान्सून दाखल झाल्याचे चित्र आहे.**

यावर्षी मान्सूनचे आगमन चार दिवस उशीरा होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान खात्याने व्यक्त केला आहे. त्यामुळे दरवर्षी 1 जून रोजी केरळमध्ये दाखल होणारा मान्सून हा या वर्षी 4 जून रोजी दाखल होणार आहे.

स्कायमेट या खाजगी एजन्सीनंही अंदमानमध्ये मान्सून उशिरानं दाखल होण्याचा अंदाज वर्तवला आहे. पण यंदा मान्सूनची सुरुवात कमकुवत दिसतेय. त्यामुळं तो विलंबाने दाखल होईल असा अंदाज स्कायमेटच्या शास्त्रज्ञांनी वर्तवला आहे. दरम्यान, महाराष्ट्रात 9 जून आणि मुंबईत 15 जूनपर्यंत मान्सूनचं आगमन होण्याची शक्यता आहे. वेगारीस ऑफ द वेदरकडून केरळात मान्सून उशिरा दाखल होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. 4 जूनपर्यंत मान्सून केरळात दाखल होण्याची शक्यता आहे. तर महाराष्ट्रात 9 तारखेपर्यंत आणि मुंबईत 15 जूनपर्यंत मान्सूनचे आगमन होणार असल्याचे दरम्यान दक्षिण भारतीय महासागर परिसरात एक चक्रीवादळ तयार होत असल्याने बाष्प तिकडे ढकलले जातील. अशात मादागास्कर परिसरात उच्च दाब तयार होण्यास आणखी काही दिवस लागण्याची शक्यता अशात मान्सूनचे ढग तयार होण्यास उशीर होण्याचा अंदाज आहे.



स्कायमेटकडून यंदाचा मान्सून सरासरीपेक्षा कमी राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे तर भारतीय हवामान विभागाकडून यंदाचा मान्सून सर्वसाधारण राहण्याचा अंदाज जाहीर करण्यात आला आहे . यावर्षी उत्तरेकडे जूनपर्यंत उष्ण हवामान कायम राहण्याचा अंदाज, त्यामुळे पेरणीला देखील उशील होऊ शकतो .




# २ हजारांच्या नोटा वितरणातून काढल्या


आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं शुक्रवारी मोठा निर्णय घेत २ हजारांच्या नोटा वितरणातून बाहेर काढल्या आहेत. २३ मे ते ३० सप्टेंबरपर्यंत आपल्याकडच्या २ हजारांच्या नोटा बँकेत जमा करता येणार आहेत. २० हजार रुपये म्हणजेच एका वेळी १० नोटा जमा करता येणार आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने शुक्रवारी २ हजार रुपयांची नोट वितरणातून काढण्याचा निर्णय जाहीर केलाय. परंतु २ हजार रुपयांच्या नोटा कायदेशीर निविदा म्हणून सुरू राहणार आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने इतर मूल्यांच्या नोटा बाजारात पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत, असे कारण देत २ हजारांच्या नोटा बाजारातून मागे घेण्याचा निर्णय जाहीर केला.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं २००० च्या नोटा चलनातून काढून घेतल्या असल्या तरी त्या नोटा सध्या अवैध ठरणार नाहीत. त्या आपल्याला दिलेल्या मुदतीपर्यंत जमा करता येणार आहेत. ८ नोव्हेंबर २०१६ ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५०० आणि १००० च्या नोटा चलनातून बंद केल्या होत्या. त्यांच्या जागी नवीन ५०० आणि २००० च्या नव्या नोटा जारी करण्यात आल्या होत्या. नोव्हेंबर २०१६ मध्ये २ हजाराची नोट बाजारात आली होती. त्यानंतर आरबीआयने २०१९ पासून २ हजारांच्या नोटांची छपाईसुद्धा बंद केली होती. दोन हजार रुपयांची नोट आरबीआय कायदा १९३४ च्या कलम २४ ( १ ) अंतर्गत आणण्यात आली. जुन्या ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा बंद झाल्यानंतर चलनाच्या गरजेमुळे २ हजारांच्या नोटा बाजारात आणल्या गेल्या. ५०० ची नोट बाजारात पुरेशा प्रमाणात आल्यानंतर २००० रुपयांच्या नोटा चलनात आणण्याचा उद्देश काहीसा फोल ठरला. त्यामुळे २०१८-१९ मध्ये २००० रुपयांच्या नोटांची छपाई थांबवण्यात आली होती.

**२००० ची नोट काळा पैशाला प्रोत्साहन देत होती :** २०१६ मध्ये नोटाबंदीच्या वेळी भ्रष्टाचाऱ्यांनी घरामध्ये दडवलेला किमान ३-४ लाख कोटी रुपयांचा काळा पैसा बाहेर येईल, अशी केंद्र सरकारची अपेक्षा होती . या संपूर्ण व्यवहारात केवळ १ .३ लाख कोटी रुपयांचा काळा पैसा बाहेर आला होता . पण आता नोटाबंदीनंतर जारी केलेल्या नव्या ५०० आणि २००० च्या नोटांमध्ये ९ .२१ लाख कोटी रुपये गायब झाले आहेत . खरं तर भारतीय रिझर्व्ह बँके ( RBI ) च्या २०१६-१७ ते २०२१-२२ वार्षिक अहवालात यासंदर्भात माहिती देण्यात आली आहे . RBI ने २०१६ पासून ५०० आणि २००० च्या एकूण ६,८४९ कोटी चलनी नोटा छापल्या आहेत . त्यापैकी १,६८० कोटींहून अधिक चलनी नोटा बाजारातून गायब आहेत . या गहाळ नोटांची किंमत ९ .२१ लाख कोटी रुपयांच्या घरात आहे . कायद्यानुसार, ज्या रकमेवर कर भरला गेला नाही, तो काळा पैसा समजला जातो . या ९ .२१ लाख कोटी रुपयांमध्ये लोकांच्या घरात जमा झालेल्या बचतीचाही समावेश असू शकतो . आरबीआयच्या अधिकाऱ्यांनीही नाव न सांगण्याच्या अटीवर हे मान्य केले आहे की, चलनातून गहाळ झालेला पैसा अधिकृतपणे काळा पैसा मानला जात नाही, परंतु या रकमेतील मोठा हिस्सा हा काळा पैसा असण्याची शक्यता नाकारता येत नाही .







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# चला एका अनोख्या सफरीवर...

पूर्वेच्या सूर्याची कोवळी किरणं अंगावर झेलत मस्त प्रार्थना ! मग कोणीतरी शिक्षक आम्हाला एखादी गोष्ट सांगायचे. कधी कधी एखादा विद्यार्थीसुद्धा गोष्ट सांगायचा. त्या गोष्टीतून आपोआपच चांगल्या गोष्टींचे संस्कार मनावर व्हायचे. गोष्टींवरून आठवलं. आमच्या शाळेत एक मोठं पुरुषभर उंचीचं लाकडी असं पुस्तकांचं कपाट होतं, त्यात नवनवीन गोष्टींची खूप पुस्तकं होती. तेव्हा आजच्यासारखी पुस्तकं सहजासहजी उपलब्ध होत नव्हती बरं का ! म्हणून त्या पुस्तकांच्या कपाटाचं मला खूप आकर्षण वाटायचं. पण आमचे शिक्षक त्या कपाटाला कुलूप लावून ठेवायचे. जणू काही मौल्यवान धनच त्यात ठेवलं आहे ! अर्थात तेच सगळ्यात मौल्यवान धन आहे हा भाग वेगळा कारण पैसा,सोनंनाणं याची चोरी होऊ शकते पण पुस्तकं आपल्याला जे ज्ञान देतात त्याची चोरी होऊच शकत नाही. पैसा, धन दिल्याने कमी होतं पण ज्ञान तर दिल्यानं वाढतं असा त्याचा महिमा ! मग ही ज्ञानाची खाण असलेली पुस्तकं गुरुजींनी मला वाचायला द्यावी म्हणून मी त्यांच्या मागे लागायचो. एका दिवशी गुरुजी एकच पुस्तक द्यायचे. ते वाचून परत केलं की दुसरं. पण ते देतानाही त्यांची एक अट असायची बरं का दोस्तांनो ! ते म्हणायचे, ' आज तू जे काही वाचलंस ते उद्या सकाळी प्रार्थनेनंतर मुलांना सांगायचं. ' मी त्यांची ही अट आनंदानं मान्य करायचो कारण त्या बदल्यात मला नवनवीन पुस्तकं वाचायला मिळायची. ती पुस्तकं काही काळासाठी माझी मित्र होऊन जायची. माझा हात धरून मला ती अनोख्या विश्वात फिरवून आणायची. कधी त्यांच्यासोबत जंगलाची सफर करायचो. गर्द हिरवीगार झाडी, उंचच उंच वाढलेली झाडे, प्राणीपक्ष्यांचे आवाज मला वेगळाच आनंद द्यायचे. वाघोबांची डरकाळी ऐकू यायची आणि भीतीने छाती धडकायची. कोकिळा, मोरांचे आवाज, सुंदर पाण्यांची सरोवरे, खळाळत वाहणाऱ्या नद्या ती पुस्तकं मला दाखवायची. दर्यावर्दी सिंदबाद मला विविध देशांच्या सफरीवर नेऊन सुरस आणि चमत्कारिक कथा सांगायचा.





## आनंदी पहाट

# चिडचिडेपणाचा परिणाम विपरीतच

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

चिडचिडेपणा ही आंदोलनाची भावना आहे. तथापि, काहीजण आंदोलनचे चिडचिडेपणाचे अधिक तीव्र स्वरूप म्हणून वर्णन करतात. जेव्हा तुम्ही कोणताही शब्द वापरता, तेव्हा तुम्ही चिडचिड करता, तुम्ही सहज निराश किंवा अस्वस्थ होण्याची शक्यता असते. तणावपूर्ण परिस्थितींच्या प्रतिसादात याचा अनुभव येऊ शकतो. चिडचिड हे तणाव, नैराश्य, पोस्ट-ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर पदार्थांचा वापर, चिंता, बायपोलर डिसऑर्डर, प्रीमेन्स्ट्रुअल सिंड्रोम, झोप कमी होणे, ऑटिझम स्पेक्ट्रम विकार, स्मृतिभ्रंश, तीव्र वेदना, स्किझोफ्रेनिया यासह अनेक गोष्टींची लक्षणे असू शकते. चिडचिडेपणा ही एकप्रकारची नकारात्मक उत्तेजक क्षमता असते, जी सजीवांना त्यांच्या सभोवतालच्या वातावरणातील बदलांना प्रतिसाद देत असते. रागाच्या सामान्य प्रकाराध्ये अन्याय, तणाव, आर्थिक समस्या, कौटुंबिक किंवा वैयक्तिक समस्या, क्लेशकारक घटना किंवा न ऐकलेले किंवा कमी मूल्यवान वाटणे यांचा समावेश असू शकतो. काहीवेळा, शारीरिक प्रक्रिया, जसे की अतितीव्र भूक, तीव्र वेदना, भीती किंवा घाबरणे देखील कोणत्याही उघड कारणाशिवाय राग येण्यास कारणीभूत ठरू शकतात. जेव्हा आपल्याला चिडचिड होत असते, तेव्हा आपल्या स्वतःला शांत करण्यासाठी काही मुख्य गोष्टी करू शकतो. चिडचिड होण्याचा स्रोत शोधावा, कॅफिन आणि अल्कोहोल यांचे सेवन करू नये, अनेकदा छोट्या छोट्या गोष्टी असतात ज्यामुळे आपली चिडचिड होते अशा गोष्टींचा त्रयस्थपणे विचार करावा, एक नवा दृष्टीकोन

मिळविण्याचा प्रयत्न करावा, चिंताग्रस्त उर्जेपासून मुक्त व्हावे, शक्य तितके दूर राहावे, मनाला शांत ठेवण्याचा प्रयत्न करावा आणि एकटे राहून स्वतःसाठी वेळ मिळवावा. चीडचीडेपणाचा परिणाम नेहमी विपरीतच होत असतो, ह्याचे भान राखावे.



आधुनिक केसरी

## तुकोबा कळावा | याच जन्मी ||

जावा अंतरी | आत्माराम एक ||
तोचि मंत्र नेक | आनंदाचा ||१||
मनाच्या शांतीचा | होऊ नये भंग ||
ऐसा संतसंग | लाभदायी ||२||
आप-पर भाव | मानु नको जीवा ||
निष्काम ही सेवा | नित्य घडो ||३||
सात्विक विचारे | मंगल घडते ||
पुण्य फळा येते | सत्कर्माने ||४||
रामकृष्ण हरि | कर्मात जपावा ||
तुकोबा कळावा | याच जन्मी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

हेमाङ्गीं ललितां देवीं भक्तहृदि
निवासिताम्|
तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं
नमाम्यहम्||४||
स्वर्णिम कांती असलेल्या,
भक्तांच्या हृदयात निवास करणाऱ्या
देवी ललितेला, दुर्गा देवीला मी तीनही
तापांच्या शांतीसाठी नमन करतो.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

अनेक जन्म दुख मरण के, त्रास वासना लाग । अभिनिवेश
ताको कहूँ, सुनु नाशक अनुराग ।।२४९।।
परम विहंग समाधि में, अनुभव शब्द प्रकाश
।
जीवन्मुक्ती होइ सो, पंच क्लेश ता नाश
।।२५०।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय)
०६/०६/२४९, २५०

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

अनेक जन्मांमध्ये अनुभवलेल्या जन्म- मृत्यूच्या यातनांचे भय जे आत्म्यामध्ये वर्तमान असते, त्यास अभिनिवेश असे म्हणतात; जे प्रेम-नाशक आहे. मृत्यूच्या भयाने कुठलाही प्राणी मरू इच्छित नाही. प्राकृतिक दुःखं असूनही त्याचे आपल्या शरीरावर प्रेम असते. म्हणून हे भय शुद्ध चेतन प्रेम नष्ट करणारे आहे. विहंगम योगाच्या सर्वोच्च विज्ञानाद्वारे समाधी अवस्थेच्या प्राप्तीने शब्द ब्रह्माचा अनुभव होतो. त्यामुळे जीवन्मुक्त अवस्थेची उपलब्धता होते, जी सर्व क्लेशांना नष्ट करणारी आहे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# सुक्ष्म आशंकानिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

तेही आजच्या सारख्या कोणत्याही आधुनिक सोई सुविधा नसताना. आणि तेव्हापासून समाजातील बरे वाईटांचा अनुभव घेत घेत समाजोध्दाराचं कार्य हाती घेतले.म्हणून समर्थ म्हणतात ब्रम्हस्वरूपाचा अभ्यास असणे गरजेचे आहे. जो खरा या वेदांचा मनापासून अभ्यास करतो त्याला या द्रयुष्य जगातील चांगल्या वाईटाचा ताळमेळ घालता येतो व समाजातील अनिष्ठ गोष्टीवर पायबंद घालण्याचा प्रयत्न करतो. ही तर आपली वेदव्यासांपासून चालत आलेली संस्कृती आहे मित्रांनो

वेदांच्या अभ्यासाचे महत्व पुढच्या लेखात

तोपर्यंत श्रीराम जय राम जय जय राम

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी


पादाहतं यदुत्थाय मूर्धानमधिरोहति ।
स्वस्थादेवापमानेषु देहिनस्तद्वरं रजः ॥

स्पष्टीकरण - अपमान सहन न करणे हे तेजस्वितेचे लक्षण आहे. तुम्ही अपमान सहन करता हे एकदा कळले, की लोक तुमचा वारंवार अपमान करतील. त्यामुळे तुमचे मन हळूहळू दुबळे बनत जाईल. तुमचा पुरुषार्थ खच्ची होईल. तुमचा आत्मविश्वासच ढासळेल. माणसे राखेचा ढीग मार्गांत आला, तर त्याला तुडवून पुढे जातात; पण जळते निखारे दिसले तर ! तर त्यांना दूर ठेवून मार्गस्थ होतात. तुम्ही तेजस्वी हा तुमचा, तुमच्या देशाचा, तुमच्या धर्माचा अपमान कधीही सहन करू नका.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

# जेथे भगवंताचे नामस्मरण | तेथे सर्व संतांचे ठाण

आधुनिक केसरी



जोंवर धरिली जगाची आस ।तोंवर परमात्मा दूर खास ॥ परमात्म्याची प्राप्ति ।न होई राखता विषयासक्ति ॥ जग विषयाकार राहिले ।तेथे प्रेम केले तरी घातासी आले ॥ विषयी एकजीव झालो जाण ।सुटता न सुटे आपण जाण ॥ मान, अपमान, जगाचे सुख-दुःख ।हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ॥ अभिमानात परमात्म्याचे विस्मरण ।हें जीवपणाचें मुख्य लक्षण ॥ सुख-दुःख, विपत्ति-आपत्ति, ।ही माया प्रपंचाची ओहोटी भरती ॥ आत्मनिश्चय बाणल्यावांचून । माया न हटे न सुटे जाण ॥ आता करी शूर मन ।मायेसी हटवावे आपण ॥ जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें ॥ एकच वस्तूची ओळखण जाण ।पूर्ण होते समाधान ॥ ज्याच्यांत मानावें मी सुख ।त्याच्यातच उद्भवतें दुःख ॥ नराचा होय नारायण ।जर न चुकला मार्ग जाण ॥ जेथे ठेवावी आस ।त्याचे बनावें लागतें दास ॥ देह तो पंचभूतांचा ।त्याचा भरवसा न मानावा फारसा ॥ मी तुम्हांस सांगतों हित ।दृश्यांत न ठेवावें चित्त ॥ दृश्य वस्तु नाशिवंत असते । भगवत्कृपेने समाधान येतें ॥ परिस्थिति नसे बंधनास कारण ।असे आपलेच मनाची ठेवण ॥ देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण ॥ विषयाचा नाही झाला जोंवर त्याग ।तोंवर रामसेवा नाही घडत सांग ॥ आपलें आत्यंतिक हित ।हेंच खरा स्वार्थ जाण ॥ चित्तीं जे विषयापासून सुटले ।ते आनंदासी आले ॥ रामनाम प्रेमयुक्त चाले धणी ।त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ॥ द्रव्यदारावर्जित जाण ।ही खरी संताची खूण ॥ सृष्टि पाहावी भगवदाकारी ।प्रेम ठेवील त्याचेवरी ।त्याला नाही दुसरी सरी ॥ आल्यागेल्यास द्यावे अन्नदान ।मुखानें भगवंताचें नाम ।हृदयांत रामाची प्रीति । यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ॥ न धरावी जगाची आस ।तोच होऊ पाहे रामदास ॥ नामांत संत ।नामीं भगवंत ॥ वृत्ति राखावी अत्यंत शांत ।हेंच संताचें मुख्य लक्षण जाण ॥ जेथे भगवंताचें नामस्मरण ।तेथे सर्व संतांचें ठाण ॥ अगरबत्ती जळून गेली ।परि सुवासाने राहिली। तैसे रामचरणी झाले जे लीन ।तेच खरे जिवंत जाण ॥ संतचरणीं झाला लीन । त्याला भाग्यास नाही दुजें उणें। संताची संगति ।भगवन्नामानें साधते ॥

**आजचे बोधवचन आहे -**

**१२१. देहासकट माझा प्रपंच ।रामा केला तुला अर्पण ॥ऐसें वाटत जावें चित्तीं । कृपा करील रघुपति ॥ श्रीराम सम**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, २० मे २०२३
adhunikkesari.com  Adhunik Kesari

# कायदा सुव्यवस्था बिघडवणाऱ्यांवर कठोर कारवाई करा : नाना पटोले

## राज्यातील पोलीस कोणाच्या दबावाखाली काम करत आहेत का?

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** महाराष्ट्र हे कायद्याचे राज्य असून सामाजिक एकोपा राखण्यात महाराष्ट्राचा लौकिक आहे परंतु मागील काही महिन्यातील घटना पाहता राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याचे काम काही लोक करत असल्याचे दिसत आहे. दोन धर्मात तेढ निर्माण करून दंगली घडवण्याचा प्रयत्न काही संस्था, संघटना करत आहेत. काही लोक भडकाऊ विधाने करुन वातावरण गढूळ करत आहेत. राज्यातील वातावरण अशांत करुन कायदा व सुव्यवस्था बिघडवणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेस पक्षाने केली असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने अतिरिक्त पोलीस महासंचालक संजय सक्सेना यांची भेट घेऊन राज्यातील कायदा व सुव्यवस्थेबाबत चर्चा केली व निवेदन दिले. या शिष्टमंडळात माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी मंत्री व प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, प्रदेश सरचिटणीस मुनाफ हकीम, प्रदेश सरचिटणीस देवानंद पवार, गजानन देसाई, प्रवक्ते निजामुद्दीन राईन, सुनिल खांडगे आदी समावेश होता. प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले पुढे म्हणाले की, राज्यातील सामाजिक एकोप्याला गालबोट लावत संभाजीनगर, अमरावती, अकोला, शेवगाव, अहमदनगर व त्र्यंबकेश्वरमध्ये जाणीवपूर्वक वातावरण बिघडवण्याचे काम केले गेले. राज्यातील वातावरण खराब करुन कायदा सुव्यवस्था बिघडवणे राज्यासाठी चिंताजनक बाब असून अशा प्रकारांना खतपाणी घालणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची गरज आहे. काही संघटनांचे नेते प्रक्षोभक वक्तव्य करून सामाजिक स्वास्थ बिघडवत आहेत. अशा पद्धतीची भडकाऊ भाषणे व वक्तव्य करणाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत असे असतानाही महाराष्ट्रात मात्र कोर्टाच्या आदेशाचे पालन होताना दिसत नाही. राज्यातील पोलीस कोणाच्या दबावाखाली काम करत आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे.

**त्र्यंबकेश्वरमध्ये दंगल घडवण्याचा डाव..**

त्र्यंबकेश्वरला धूप दाखवण्याच्या प्रकरणाला काही संघटनांनी जाणीवपूर्वक वादाचा रंग देऊन वातावरण बिघडवण्याचे काम केले. गावकऱ्यांनी सामंजस्याची भूमिका घेत गावात शांतता असल्याचे स्पष्ट केले असतानाही बाहेरुन काही संघटनांचे लोक त्र्यंबकेश्वरमध्ये जाऊन चिथावणी देण्याचे व वातावरण अशांत करण्याचा प्रयत्न करत आहेत. सामाजिक शांतता भंग करून वातावरण पेटवण्याचे काम करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई केली पाहिजे. रत्नागिरी जिल्ह्यातील बारसू रिफायनरीला स्थानिकांचा तीव्र विरोध आहे. या प्रकल्पाला विरोध करणाऱ्या स्थानिकांना व महिला आंदोलकांवर पोलीस बळाचा वापर केला हे अत्यंत गंभीर आहे. प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांना तडीपार केले जात आहे. हा पोलिसी अत्याचार थांबवून आंदोलकांवरील गुन्हे मागे घेतले पाहिजेत. मुंबई-वडोदरा महामार्गासाठी जमीन संपादन करताना आदिवासी महिलांवरही अत्याचार करण्यात आले. हा अत्याचार थांबवून संबंधीत पोलिसांवर कारवाई केली पाहिजे.

**भ्रष्ट अधिकारी समीर वानखेडेचे भाजपा समर्थन का करत आहे?**



वादग्रस्त अधिकारी समीर वानखेडे यांच्यावर सीबीआयने कारवाई सुरु केली असून त्यांच्या भ्रष्ट कारभाराची चौकशी सुरु आहे. वानखेडेने नामांकित व्यक्तींना ब्लॅकमेल करुन माया गोळा केल्याचा त्याच्यावर आरोप आहे. वानखेडेंची सीबीआय चौकशी सुरु असताना गृहमंत्री फडणवीस, मंत्री सुधीर मुनगंटीवारांसह भाजपाचे अनेकजण वानखेडे यांचे समर्थन करत आहेत. वानखेडेला वाचवण्यासाठी भाजपाचे हे लोक का पुढे आलेत? वानखेडे भाजपाचा कोण लागतो? सरकारी सेवेत असलेला समीर वानखेडे नागपुरला जाऊन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयाला कशासाठी भेट देतो? तो कुणाला भेटला व कशासाठी? हे उघड झाले पाहिजे असे नाना पटोले म्हणाले..

**महिला व मुली मोठ्या संख्येने बेपत्ता होणे चिंताजनक..**

राज्यातून बेपत्ता होणाऱ्या महिला व मुलींची वाढती संख्या ही आणखी एक चिंताजनक बाब आहे. महाराष्ट्रातून दररोज सरासरी ७० मुली बेपत्ता होत आहेत, जानेवारी ते मार्च २०२३ या तीन महिन्याच्या कालावधीत राज्यातून सुमारे ५५१० मुली बेपत्ता झाल्याचे समजते. राज्यातून मुली व महिला बेपत्ता होत असताना सत्ताधारी 'केरल स्टोरी' सिनेमा बघण्यात मग्न आहेत. मुली बेपत्ता प्रकरणी योग्य ती पावले उचलून महिलांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने कराव्यात. महाराष्ट्र कायद्याचे राज्य आहे व ते कायद्याचे राज्य राहिल यासाठी योग्य ती पावले उचला असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

# न्यायमूर्ती आता स्वत: पाहणार द केरला स्टोरी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमध्ये द केरला स्टोरी चित्रपटावरील बंदीचे आदेश सर्वोच्च न्यायालायने स्थगित केला आहे. तसंच, राज्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी राज्याची असल्याचे सांगून पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू सरकारचे कान टोचले आहेत. तर, दुसरीकडे या चित्रपटातील टीझरनुसार ३२ हजार महिलांच्या धर्मांतराचा आकड्याबाबत अधिकृत माहिती नसेल तर हा चित्रपट काल्पनिक असल्याचे जाहीर करा. तसे डिस्क्लेमर चित्रपट स्क्रिनिंगच्या आधी लावण्याचे निर्देशही देण्यात आले. दरम्यान, भाषण स्वातंत्र्य असले तरीही एखाद्या समुदायाला बदनाम करण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालय देऊ शकत नाही, असंही न्यायाधीशांनी पुढे नमूद केलं. भारताचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड, न्यायाधीश पीएस नरसिंहा आणि न्यायाधीश जे. बी. पार्डीवाला यांच्या खंडपीठासमोर काल (१८ मे) सुनावणी झाली. आम्ही अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण करत असलो तरीही तुम्ही एखाद्या समुदायाला बदनाम करू शकत नाही, असं सर्वोच्च न्यायालयाने चित्रपट निर्मात्यांना सुनावले आहे. "चित्रपटातील संवाद टीझरपेक्षाही खूप वाईट आहेत. यामध्ये केरळमध्ये ३२ हजार महिलांना फसवून त्यांचे धर्मांतर करून त्यांना आयएसआयएसमध्ये दाखल केल्याचा उल्लेख आहे", असा दावा जमियत उलेमा ए हिंद तर्फे असलेले वकील कपिल सिब्बल यांनी केला. यावेळी या चित्रपटातील काही आक्षेपार्ह वक्तव्यही वकिलांनी कोर्टासमोर मांडली. तसंच, खंडपीठाने हा चित्रपट पाहावा अशी मागणीही वरिष्ठ अधिवक्ता हुजेफा अहमदी यांनी केली. "हा चित्रपट तुम्ही पाहा आणि तुम्ही निर्णय घ्या. हा चित्रपट चालला तर खूप नुकसान होईल. तसंच, हा चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित करण्यासंदर्भातही निर्णय घ्यावा लागेल," असं अहमदी म्हणाले. अहमदी यांची मागणी खंडपीठाने मान्य केली असून न्यायाधीश आता चित्रपट पाहणार आहेत आणि मग निर्णय जाहीर करणार आहेत.

या चित्रपटामुळे प्रपोगंडा तयार होऊ शकतो. या समाजातील व्यक्त घर भाड्याने घेण्यास गेली तरी त्यांना भेदभावाला सामोरे जावे लागेल. रोजगार मिळतानाही अडचणी निर्माण होतील. हा चित्रपट पाहिल्यानंतर एखाद्याच्या मनात या समुदायाबद्दल एक दृष्टीकोन तयार होऊ शकतो, ज्यामुळे या समुदायाला नोकरी आणि घर मिळणे कठीण होऊन बसेल", असंही युक्तीवादात म्हटलं आहे.




# संतप्त शेतकऱ्यांनी केली 'कापसाची होळी'

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** सध्या कापसाला योग्य हमीभाव नाही. जिनिंगमध्ये रुईच्या गाठी पडल्या आहेत. गिरण्यांमध्ये कापसाचा धागा पडून आहे. यामुळे कापूस पीक धोक्यात आले आहे. केंद्र सरकारने कापूस उत्पादकांच्या जीवावर न उठता कापसाला तत्काळ नऊ हजार रुपये प्रति क्विंटल हमी भाव द्यावा, अशी मागणी शेतकरी नेते विजय जावंधीया यांनी पांढरकवडा येथे कापूस होळी सत्याग्रहात केली. पांढरकवडा येथील तहसील चौकात शेकडो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत कापूस होळी आंदोलन करण्यात आले. यावेळी विजय जावंधीया म्हणाले, केंद्र सरकारने ५० लाख खंडी रुई ७० हजारच्या दराने बाजारातून विकत घ्यावी. त्यावर अनुदान देऊन त्याची निर्यात केल्यास भारतातील कापसाची मंदी दूर होऊ शकते. अन्यथा, पुढील वर्षीही कापूस उत्पादक शेतकरी प्रचंड आर्थिक संकटात येतील. केंद्र सरकारने हा विषय गंभीर्याने घेऊन कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणीही जावंधीया यांनी यावेळी उपस्थित शेतकऱ्यांच्या वतीने सरकारला केली. या सत्याग्रहात शेतकरी नेते किशोर तिवारी, मोहन मामीडवार, जिल्हा परिषदचे माजी उपाध्यक्ष मुबारक तंवर, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अमर पाटील, पांढरकवडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती प्रेम राठोड, अंकित नैतात आदींनी विचार मांडले.

गेल्यावर्षी कापसाला प्रति क्विंटल १२ हजार रुपये दर मिळाल्यामुळे यावर्षी विक्रमी एक कोटी १२ लाख हेक्टरवर कापसाची लागवड करण्यात आली. सुरुवातीला प्रचंड पावसाने कापसाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यामुळे लागवडीचा खर्च करून जेमतेम ३० ते ४० टक्के कापसाचे उत्पन्न घेतले. कापसाचे दर वाढतील म्हणून शेतकऱ्यांनी कापूस अद्यापही घरी ठेवला आहे. मात्र कापसाचे दर सात हजार ५०० रुपये प्रति क्विंटलवर स्थिर आहे. यावर्षी कापसाचे गणित चुकल्याने सरकारने ८० लाखांवर कापूस उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटल पाच हजार रुपये अनुदान जाहीर करावे, अशी मागणी यावेळी शेतकऱ्यांनी केली.



# ज्ञानवापीचा गुंता वाढला

आधुनिक केसरी

ज्ञानवापी मशिदीत सापडलेल्या शिवलिंगच्या वैज्ञानिक सर्वेक्षण प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या आदेशाला पुढील सुनावणीपर्यंत स्थगिती दिली आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाने शिवलिंगाच्या कार्बन डेटिंगचे आदेश दिले होते. त्यानंतर ज्ञानवापी मशिद कमिटीने या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. सुनावणीदरम्यान मशीद समितीचे प्रतिनिधित्व करणारे वकील हुजैफा अहमदी म्हणाले की, या प्रकरणात दिवाणी खटल्याशी संबंधित नियमांचे पालन केले जात नाही. त्याचवेळी हिंदू पक्षाचे वकील विष्णू जैन म्हणाले की, एएसआयने आम्हाला अहवाल दिला आहे की या जागेला इजा होणार नाही. यावर सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड म्हणाले की, आम्ही एएसआयकडूनही अहवाल घेऊ शकतो. सरकारने कोणत्या पद्धतींचा अवलंब करता येईल याचाही विचार करू द्या. आम्ही यावर नंतर सुनावणी घेऊ. सर्व पक्षांनी ती मान्य केल्यामुळे आम्ही नोटीस जारी करत आहोत, असे ते म्हणाले. आता उच्च न्यायालयाच्या आदेशाचा फेरविचार करण्याची गरज आहे. अशा स्थितीत याची अंमलबजावणी होऊ नये असंही ते म्हणाले.

या आधी वाराणसी न्यायालयाने या शिवलिंगाच्या कार्बन डेटिंगला परवानगी नाकारली होती. त्यानंतर हा वाद अलाहाबाद उच्च न्यायालयात पोहोचला. अलाहाबाद न्यायालयाने वाराणसी न्यायालयाचा निकाल बदलला आणि ज्ञानवापीमध्ये सापडलेल्या शिवलिंगाचे कार्बन डेटिंग करण्याची परवानगी दिली. हे शिवलिंग किती जुने आहे याचे वैज्ञानिक सर्वेक्षण करावं असा आदेश अलाहाबाद न्यायालयाने दिला. ज्ञानवापी मशिदीतील ते शिवलिंग किती जुने आहे हे वैज्ञानिक सर्वेक्षणाद्वारे शोधावे लागेल, ते खरोखर शिवलिंग आहे की आणखी काहीतरी आहे याचाही शोध घेण्याचे आदेश अलाहाबाद न्यायालयाने दिले होते. अलाहाबाद न्यायालयाच्या या निर्णयाला ज्ञानवापी मशिद कमिटीने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं. यावर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने पुढील आदेश येईपर्यंत कार्बन डेटिंगसंबधी देण्यात आलेल्या अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती दिली आहे. ऑगस्ट 2021 मध्ये पाच महिलांनी श्रृंगार गौरी पूजेसाठी आणि अन्य धार्मिक बाबींसाठी एक याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेनंतर दिवाणी कोर्टाचे न्या. रवी कुमार दिवाकर यांनी कोर्ट कमिश्नर नियुक्त करून ज्ञानव्यापी मशिदीचे सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले. हिंदू पक्षकारांनी दावा केली की, या सर्वेक्षणादरम्यान मशिदीच्या आवारात शिवलिंग आढळून आले. तर, मुस्लिम पक्षकारांनी सांगितले की हा फवारा आहे. त्यानंतर हिंदू पक्षकारांनी हा भाग सील करण्याची मागणी केली होती. कोर्टाने हा भाग सील करण्याचे आदेश दिले.

# आभासी जगातील आजचा समाज



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**माहिती क्रांती आणि तंत्रज्ञानाच्या विकासामुळे एक कृत्रिम जग निर्माण झाले आहे. एक असे जग जिथे काहीही वास्तविक नाही, सर्वकाही आभासी आहे. कृत्रिम समाज, कृत्रिम माणसं, कृत्रिम नाती, कृत्रिम भावना, कृत्रिम बुद्धिमत्ता, कृत्रिम सौंदर्य आणि इतकंच नव्हे तर कृत्रिम जीवन, कृत्रिम श्वास आणि अगदी कृत्रिम हसणंदेखील! सर्वकाही आभासी! याचा परिणाम असा होतोय की आभासी वस्तूंसोबत जगत असताना माणूस वास्तविक जीवनापासून दूर जात आहे. आभासी जगात सर्व काही क्षणिक, तात्पुरते आहे, सामाजिक आणि जवळचे नातेदेखील तात्पुरते आणि कृत्रिम होत चालले आहे.**

जोपर्यंत त्या गोष्टी उपयुक्त आहेत तोपर्यंत त्याचा किंवा त्याच्या संबंधांचा वापर करा, आणि जेव्हा त्यांची आवश्यकता नसते तेव्हा त्यांच्याशी नाते समाप्त करा. संबंध तोडून टाका. वास्तविक आज जीवन संगणकाच्या एका क्लिक सारखे सोपे झाले आहे. तुम्हाला हव्या असलेल्या गोष्टी एका क्लिकवर तुमच्यापर्यंत पोहोचतात. असे म्हणता येईल की अत्याधुनिक तंत्रज्ञान म्हणजे संगणक, स्मार्टफोन इ. आधुनिक जगातील हे असे जिन्नस आहेत जे आपली इच्छा व्यक्त करताच आपल्या 'आका' ची आज्ञा पूर्ण करण्यास तत्पर असतात. फरक एवढाच आहे की पूर्वीचे जिन फक्त आजा- आजीच्या गोष्टींमध्येच असायचे, तर आजचे आधुनिक जिन हे वास्तव जगाचा अविभाज्य भाग बनले आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील अभूतपूर्व प्रगतीमुळे तर्कशुद्धतेचे महत्त्व दिवसेंदिवस कमी होत असल्याचेही समाजशास्त्रज्ञ हॅबरमास यांनी म्हटले आहे.

आता माणसाची तर्कशुद्धता त्याला ध्येयाकडे जाण्यास प्रवृत्त करत नाही, तर केवळ संसाधने गोळा करण्यास मदत करते. याचाच परिणाम म्हणजे मानवाने निर्माण केलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाने माणसालाच आपला गुलाम बनवले आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे आधुनिक माणूस स्वतःला पूर्वीपेक्षा अधिक मुक्त समजू लागला आहे, तर वास्तव हे आहे की तो पूर्वीपेक्षा अधिक परावलंबी होत चालला आहे. काही काळापूर्वीची एक घटना इथे नमूद करणे समर्पक ठरेल. आसाममधील एक नवविवाहित जोडपे त्यांच्या विवाह समारंभानंतर एका करारावर स्वाक्षरी करते.या करारात दोघांनीही काही अटी ठेवल्या आहेत जसे की महिन्यातून एकच पिझ्झा खाणे, घरच्या जेवणाला नेहमी हो म्हणणे, रोज साडी नेसणे, रात्री उशिरा पार्टी करायला पण फक्त एकमेकांसोबत जाणे, रोज जिमला जाणे, दर रविवारी सकाळी नवऱ्याने तयार केलेला नाश्ता खाणे. पंधरवड्याला खरेदी करायला जाणे इ.

नात्यात एवढा कृत्रिमपणा आणि अविश्वास आहे की लेखी तडजोड करण्याची गरज भासते हेच नवल! काही वर्षांपूर्वी अशाच प्रकारची घटना एका महानगरात घडली होती, ज्यामध्ये वधू-वरांनी लग्न समारंभात फेऱ्या मारत असताना अशा कराराची चर्चा केली होती, ज्यानुसार ते सहा महिने एकत्र राहतील आणि त्यांच्यात जमले नाही तर, ते कोणत्याही कायदेशीर कारवाईशिवाय परस्पर संमतीने वेगळे होतील. एक काळ असा होता जेव्हा विवाह म्हणजे संस्कार आणि पवित्र बंधन मानले जात होते, आज तीच विवाह नावाची संस्था आधुनिक समाजात मोडकळीस आली आहे. ही केवळ आभासी जगाची देणगी आहे. दोन-तीन वर्षांपूर्वी एका चिनी शास्त्रज्ञाने जीनोम-मॉडिफिकेशन तंत्रज्ञानाने जुळ्या मुली जन्माला घातल्याचा दावा करून वैद्यक आणि संशोधनाच्या जगात खळबळ उडवून दिली होती. या शास्त्रज्ञाने असा दावा केला आहे की असे डिझायनर बाळ संक्रमण आणि कर्करोगासारख्या गंभीर आजारांपासून सुरक्षित असेल. बेबीक्लोन ही कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान्या (AI) क्षेत्रातील एक नवीन क्रांती आहे.

नैसर्गिक कृतींशी छेडछाड करून मानवी जीवनाला कोणत्या प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागू शकते किंवा जनुकीय सुधारित बाळांचा भावी पिढ्यांवर कसा परिणाम होऊ शकतो हे सांगणे कठीण आहे. त्यामुळे हा प्रश्न शेवटी विचार करायला भाग पाडतो की असे कोणते जग उदयास येत आहे जिथे लग्नासाठी पुतळा, लैंगिक इच्छांसाठी रोबोट आणि सिलिकॉन बेबी लोकांच्या पसंतीस उतरत आहेत. म्हणजेच, एक आभासी जग जिथे काहीही वास्तविक नाही. लग्न, पती-पत्नीच्या नात्यापासून ते मुलापर्यंत सर्व काही खोटे आहे. आणखी एक धक्कादायक उदाहरण म्हणजे आभासी जग.




या वर्षाच्या सुरुवातीला तामिळनाडूतील तरुण-तरुणीच्या लग्नासाठी आभासी जग तयार करण्यात आले होते. यामध्ये वराच्या मृत वडिलांचे एक आभासी पात्र तयार करण्यात आले होते, जे वधू-वरांना आशीर्वाद देखील देऊ शकतात. यासोबतच वधू-वर, त्यांचे मित्र आणि नातेवाईक यांचे आभासी अवतारही तयार करण्यात आले.या लग्नाला उपस्थित राहण्यासाठी खऱ्या जगातून आभासी जगात जावे लागेल. जिवंत असताना मृत समाजात (काल्पनिक जगात) सामील होण्याचे निवडणे म्हणजे भ्रमात जगणे किती हास्यास्पद आहे ? या तंत्रज्ञानाच्या जगात मृत्यूला नकार देणारे तंत्रज्ञानही उदयास आले आहे. वास्तविक नातेसंबंधांकडे दुर्लक्ष करून आभासी नातेसंबंधांच्या शोधात वास्तविक जीवन सोडण्यास माणूस उत्सुक आहे हे किती मोठे दुर्दैव आहे.

प्रश्न असा आहे की अशा परिस्थितीत विवाह, कुटुंब, नातेसंबंध आणि समाजाची व्याख्या काय असावी ? समाजशास्त्रज्ञांना या व्याख्या पुन्हा कराव्या लागतील. आजचे आभासी जग खरेच समाज आणि कुटुंब संपवण्याची तयारी करत आहे का ? लोक अनौपचारिक संस्थांना (कुटुंब, विवाह, नातेसंबंध) इतके कंटाळले आहेत का की त्यांचा या संस्थांवरील विश्वास उडाला आहे, किंवा या सामाजिक संस्था ज्या भूमिका पार पाडण्यासाठी तयार केल्या गेल्या आहेत त्या पूर्ण करण्यात अपयशी ठरत आहेत ? समाजशास्त्राच्या संशोधकांनी या प्रश्नांवर संशोधन करण्याची गरज आहे, जेणेकरून त्यामागे दडलेले कारण-परिणाम संबंध शोधून त्या सोडवण्याचा प्रयत्न करता येईल. इथे एक मोठा प्रश्न उभा राहतो की जर कोणी अशा प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर करून कोणतीही कमतरता भरून काढली, तर ती कृत्रिम हृदय, कृत्रिम डोळा, कृत्रिम हात-पाय इत्यादी काही प्रमाणात स्वीकारलेही जाऊ शकते. पण खरा समाज आणि खरी नाती असूनही व्यक्ती आभासी समाज आणि नातेसंबंधांकडे वाटचाल करत असेल, तर ते मानसिक दिवाळखोरीचे लक्षणच म्हणावे लागेल.

त्यामुळे मानवामध्ये नवीन प्रकारचे मानसिक आजार दिसून येत आहेत. सायबरस्पेसने ऑनलाइन व्यक्तिमत्त्व आणि ऑफलाइन व्यक्तिमत्त्वाच्या नवीन वर्गीकरणाला जन्म दिला आहे ज्यामुळे स्किझोफ्रेनियाच्या नवीन स्वरूपाचा जन्म होतो. येथे ऑनलाइन व्यक्तिमत्व वास्तविकतेपासून दूर असलेल्या व्यक्तीचा संदर्भ देते. तो अमर्यादित वेळ ऑनलाइन राहून आपला मौल्यवान वेळ घालवतो आणि सामाजिक जीवनापासून किंवा वास्तविक जीवनापासून अलिप्त होतो आणि तो आभासी जगात आपला सोबती आणि आनंद शोधू लागतो. प्रश्न असा आहे की आजच्या समाज आणि जीवनातील समस्यांपासून वाचण्यासाठी आभासी जग हा एक चांगला पर्याय असू शकतो का ? उत्तर असेल, बहुधा नाही. मग खरा समाज राहण्यायोग्य बनवणे आणि त्यात निर्माण होणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्याचे मार्ग शोधणे आवश्यक आहे. समस्या किंवा आव्हानापासून दूर पळणे हा समस्येवरचा उपाय नसून सामूहिकपणे सोडवण्याचा प्रयत्न करणे हाच कायमस्वरूपी उपाय असू शकतो. या तंत्रज्ञानावर आधारित जगाचा भाग बनण्यापासून स्वतःला थांबवण्याची अजून वेळ आहे. माणसाने तंत्रज्ञानावर नियंत्रण ठेवले तर चांगलं असं म्हणतात, पण तंत्रज्ञान माणसावर नियंत्रण ठेवू लागलं की त्याच्या अस्तित्वालाच आव्हान मिळू लागतं. म्हणूनच व्हर्च्युअल नातेसंबंधांना वास्तविक जग आणि वास्तविक नातेसंबंधांनी बदलण्याची गरज आहे जेणेकरून हा समाज पुन्हा राहण्यायोग्य आणि जगण्यायोग्य होईल.

# देशाचा विश्वासघात करणाऱ्यांना मृत्यूदंडाची शिक्षा व्हावी



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**देशाला घडविण्यासाठी देशाचे डॉक्टर, शास्त्रज्ञ, वैज्ञानिक, उद्योजक, खेळाडू इत्यादी अनेक क्षेत्रांतील मान्यवर जीवाचीपर्वा न करता देशाच्या विकासाची वाटचाल सुलभ करतात.परंतु कुरूलकरांसारखे देशासी गद्दरी करतात ही स्वतंत्र भारतासाठी चिंतेचा विषय आहे.कारण देश घडविण्यासाठी अनेक वर्षे लागतात तेव्हा देश घडतो.परंतु कुरूलकरांसारखे गद्दार चांगल्या कामांवर पाणी फेरतात या सारखे मोठ दु:ख कोणते म्हणावे!भारत सध्याच्या परिस्थितीत अत्याधुनिक युगात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भारत जगात तिसरी महाशक्तीच्या रूपात जगापुढे येत आहे.याकरीता देशातील प्रत्येक व्यक्ती आपापल्या परीने योगदान देत आहे व देश आज प्रगती पथावर आहे.**

परंतु यात खलल व बाभळीचे काटे रोवण्याचे काम डीआरडीओतले वरिष्ठ शास्त्रज्ञ प्रदीप कुरूलकर यांना पाकिस्तान इंटेलिजन्स ऑपरेटिव्हच्या हस्तकांशी सोशल मीडियाच्या माध्यमातून अती संवेदनशील शासकीय गुपिते पुरविण्याच्या आरोपाखाली दहशतवाद पथकाने (एटीएसने) दिनांक 4 मे 2023 रोजी अटक केली होती.यानंतर नवीन नवीन उलघडे सामोरं येतांना दिसत आहे. आता कुरूलकरांनंतर गुप्तचर विभागासह वायुदलाचा अधिकारी अडकला असल्याचे सांगितले जाते.त्याचप्रमाणे कुरूलकरचे "हनी ट्रैप"मामल्याचे कनेक्शन नागपूर, पुणे, नाशिक पर्यंत पोहले आहे त्यामुळे हा मामला अत्यंत गंभीर आहे.त्यामुळे याप्रकरणात एटीएसने न्यायालयाकडे "पॉलिग्राफ टेस्ट"ची परवानगी मागितली आहे.म्हणजेच याप्रकरणात कुरूलकरसह अनेक मोठी मासे अडकु शकतात.परंतु प्रदिप कुरूलकर यांच्या प्रकरणात दिवसेंदिवस नवनवीन माहिती समोर येत असल्याने चिंता वाढली आहे.कुरूलकर यांच्या एका मोबाईल मधील व्हॉट्सअॅप डिलिट केल्याचे उघडकीस आले आहे.परंतु एटीएसने डिलिट केलेले व्हाट्सअॅप पुन्हा डाउनलोड करून त्यांच्या क्रमांकाचे व्हॉट्सअॅप सुरू केले आणि त्याचा संपूर्ण बॅकअप घेतला आहे.त्यामुळे त्यातून महत्वाची माहिती मिळाल्याचा दावा एटीएसकडुन करण्यात आला आहे.अटकेत असलेले कुरूलकर यांना न्यायालयीन कोठडीत 29 मेपर्यंत ठेवण्याचे आदेश पुणे न्यायालयाचे विशेष न्यायाधीश पी.पी.जाधव यांनी दिले.त्यानुसार येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. दहशतवाद विरोधी पथकाने असा दावा केला आहे की डीआरडीओच्या गेस्ट हाऊसवर प्रदीप कुरूलकर काही महिलांना भेटले.या महिला कोण आणि त्यांचा याप्रकरणाशी काय संबंध आहे याचा तपास अजुन सुरू असल्याचे तपास यंत्रणेकडून सांगण्यात आले आहे.यासोबतच कुरूलकर यांच्या सोशल मीडिया अकाउंटचा तपास करून पीओआयकडून वापरलेल्या आंतरराष्ट्रीय नंबर आणि त्यावरून केलेल्या कॉल्सच्या रेकॉर्डचा तपास करणार असल्याचे दहशतवाद विरोधी पथकाकडून सांगण्यात आलेले आहे. कुरूलकर यांच्या आरोपांच्या अंतर्गत आतापर्यंत बेंगलुरूच्या वायुसेनेचा एक अधिकारीसह आठ लोकांचे बयान दर्ज करण्यात आलेला आहे.चौकशीच्या दरम्यान हेही लक्षात



आले की कुरूलकर यांच्या व्हॉट्सअॅप चैट डेटा मध्ये दोन महिलांचे संशयास्पद मोबाईलच्या बाबतीत सुद्धा चौकशी सुरू आहे. त्यामुळे कुरूलकर मामला अत्यंत गंभीर व संवेदनशील असल्याने कुरूलकरचा निकाल फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून लावून सरकारने मृत्यू दंडाची शिक्षा ठोठावली पाहिजे. कारण कुरूलकरांनी देशाच्या 135 कोटी जनतेसोबत खुली गद्दारी केली आहे. एकीकडे कुरूलकरांचा मामला सुरूच आहे तर दुसरीकडे देशाच्या संरक्षणासंदर्भातील संवेदनशील माहिती विदेशी गुप्तचर संस्थांना पुरविल्याच्या व हेरगिरीच्या आरोपावरून सीबीआयने मुक्त पत्रकार विवेक रघुवंशीसह नौदलाचा माजी कमांडर आशिष पाठक या दोघांना अटक केली आहे.पत्रकार विवेक रघुवंशी व त्यांच्या साथीदारांशी संबंधित दिल्ली एनसीआर, जयपूर येथील ठिकाणांवर सीबीआयने काही दिवसांपासून धाडी घातल्या होत्या.तेथुन लॅपटॉप, टॅबलेट, मोबाईल फोन,हार्ड डिस्क,पेन ड्राईव्ह अशी 48 इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त करण्यात आली.म्हणजे आपण समजू शकतो की कुरूलकर, विवेक रघुवंशी, नौदलाचे माजी कमांडर आशिष पाठक यांना सरकारने मान-सन्मान, नौकरी-चाकरी व पैसा देऊनही देशासी व देशवासीयांशी गद्दरी केली व ज्या ताटात खाल्ले त्याच ताटाला छिद्र पाडण्याचे काम या देशद्रोही लोकांनी केले आहे याचे दुःख संबंधित विभागाला तर आहेच.परंतु देशाच्या 135 कोटी लोकांच्या स्वप्नावर पाणी फेरण्याचे काम यांनी केले यामुळे भारत सरकारने अशां विश्वासघाती लोकांना मृत्यू दंडाची शिक्षा ठोठावली पाहिजे असे जर झाले देशात असे गद्दार कधीच निर्माण होणार नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



## श्री भद्रा मारोती छत्रपती संभाजीनगर

जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुख:तू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, छत्रपती संभाजीनगर मो : 9422201977

सौजन्य : इंटरनॅशनल स्पोर्टस,
2, सरस्वती संकूल, सिटी बँकजवळ, एस.बी. बसस्टँडसमोर, निराला बाजार, छत्रपती संभाजीनगर. मो. 9673538888

# संत ज्ञानेश्वर उद्यानाला जागतिक दर्जा मिळवून देऊ : ना.भुमरे

## लवकरच उद्यान पर्यटकांसाठी खुले होईल

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद अंतर्गत पैठण येथील संत ज्ञानेश्वर उद्यानच्या विकास कामांचा भुमिपुजन कार्यक्रम रोहयो मंत्री संदिपान भुमरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी चव्हाण, पाटबंधारे विभागाचे अधिक्षक सबनवार, अभियंता अशोक चव्हाण याची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मंत्री भुमरे यांनी यावेळी बोलताना सां कितले कि संत ज्ञानेश्वर उद्यानाला जागतिक लेवलचा दर्जा कसा मिळेल या कडे लक्ष देवुन चाळीस वर्षापूर्वी जसे उद्यान होते तसेच करण्यात येईल तसेच या ठिकाणी जागा भरपूर असल्याने पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांना ईथे निवासी व्यवस्था हि करणार असुन सध्या पुर्वीसारखे उद्यान पहायला खुले केले जावुन पैठण च्या पर्यटकात नक्कीच भर पडुन ईथला व्यापार वाढेल,असे मनोगत व्यक्त केले. यावेळी संत ज्ञानेश्वर उद्यानाच्या विविध विकास कामे प्रत्यक्षात सुरू झाल्याने सध्या। रस्ते, पार्किंग, पाईपलाईन, संगीतकारंजे, ई पहील्या टप्प्यात कामे होणार असुन पुढील निधीसाठी प्रयत्न करून दुसर्या टप्प्यात उर्वरित कामे करून दिवाळी पुर्वी संत ज्ञानेश्वर उद्यान पर्यटकासाठी नक्कीच खुले करण्यात येईल पैठण कराच्या वतीनं शहर व्यापारी महासंघाच्या वतीने अध्यक्ष पवन लोहीया,बलराम लोळगे,जगदीश लोहीया, तसेच उद्यान बचाव समिती तर्फे प्रा.संतोष गव्हाणे, बाळु आहेरयांनी पालकमंत्री भुमरे यांचे स्वागत करून अभार मानले. यावेळी मुंबई महानंदचे संचालक नंदलाल काळे, सभापती राजुनाना भुमरे, सोमनाथ परदेशी, रवींद्र शिसोदे, विजय पापडीवाल, शहादेव लोहारे, शेखर शिंदे, ईनरव्हिल क्लबच्या लोखंडे मँडम,ज्योती पठाडे, जनार्दन मिटकर, किशोर चौधरी, पैठण व्यापारी अध्यक्ष ज्ञानेश्वर उगले, रामेश्वर सुसे आदी उपस्थित होते.



# शाळा प्रवेश, संचमान्यतेसाठी आधारची सक्ती नको

## शिक्षक सेना राज्याध्यक्ष ज. मो. अभ्यंकर यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** सर्वोच्य न्यायालयाच्या शाळा प्रवेशाला आधार सक्ती नको असा आदेश आसतांना सुध्दा सद्या शासनाने एक आदेश दिला आणि त्या आदेशा नुसार संचमान्यता मंजूर करतांना आधार कार्ड असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या संचमान्यतेत ग्राह्य धरण्यात येणार आहे. परंतू बऱ्याच विद्यार्थ्यांना आधार कार्ड नोंदणी करण्यात अडचणी येत आहेत शाळा प्रवेश रजिस्टर व आधारवरील नावात बऱ्याच विद्यार्थात प्रिंन्ट मिस्टीक होत आहे दुरुस्ती साठी बराच कालवधी लागत आहे. त्यामुळे शिक्षक मोठ्या संख्येने अतिरिक्त होऊ शकतात. म्हणुन सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विद्यार्थ्यांना शाळा प्रवेश वेळी आधार कार्ड सक्ती करू नये असे असताना संचमान्यता करतांना आधार कार्ड नुसार संच मान्यता दिल्यास सर्वोच्च न्यायालयाचा अवमान होऊ शकतो. म्हणुन संचमान्यता करतांना आधार कार्ड नसलेले व आधार कार्डात दुरुस्ती होत नसलेले विद्यार्थी यांना नवगळाता संच मान्यता करण्यात यावी या बाबतीत महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना प्रांताध्यक्ष सन्मा अभ्यंकर साहेब यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेतर्फे शालेय शिक्षण मंत्री आदरणीय दिपक केसरकर यांना 18 मे 2023 रोजी पत्र दिले आहे. या पत्राची दखल शासनाने घेतल्यास अनेक शिक्षक अतिरिक्त होणार नाहीत.

# एन. टी. व्ही. न्यूजकडून जब्बार तडवी यांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील एन.टिव्ही मराठी न्यूजचे सोयगाव तालुका प्रतिनिधी जब्बार दादेखा तडवी यांची निर्भिड रोखठोक पत्रकार म्हनुण ओळख आहे. नेहमीच शेतकरी यांच्या प्रश्न व समस्या सरकारी दरबारी मांडणारे शेतकऱ्यांना हक्काचे अनुदान मिळवून देणारे निर्भिड पत्रकार, ग्रामीण भागातील सर्व सामान्य जनतेला न्याय जगासमोर आण्याची दमख असणारे लोकप्रिय पत्रकार व सर्व सामान्य नागरिकांना आपल्या हक्काचे सरकारी कायदा व नियम यांचे मार्गदर्शन करणारे पत्रकार म्हणून त्यांची सोयगाव तालुक्यात, जिल्ह्यात त्यांची ऑलख निर्माण केली आहे. म्हणून त्यांना दिनांक १७ / ५ / २०२३ रोजी अहमदनगर येथे एन.टिव्ही .न्युज मराठी वृत्तवाहिनीचा एकवीसावा वर्धापन दिनानिमित्त मुख्य संपादक इकबाल शेख यांच्या हस्ते शाल श्रीफळ,सन्मान चिन्ह व पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले.यावेळी उपस्थित मान्यवर एन.टिव्ही.न्यूजचा वर्धापण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला या वर्धापण दिनाला महाराष्ट्राच्या कान्याकोप-यातुन मोठ्या संख्यने एन.टिव्ही .न्युज मराठी वृत्तवाहिनीचे प्रतिनिधी शामील झालेले होते तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष राम शिंदे विधानपरिषद आमदार, प्रमुख पाहुणे म्हनुण आमदार संग्राम जगताप अहमदनगर शहर, प्रमुख पाहुणे नंदकुमार सातपुते ज्येष्ठ पत्रकार, मुख्यसंपादक इकबाल शेख,अनंत बहु उद्देशिय सेवा संस्था चे अध्यक्ष एस.एच. बेग , उप संपादक अबरार शेख या कार्यक्रमादरम्यान उपस्थित होते. याप्रसंगी जब्बार डी तडवी जब्बार तडवी यांना हा सन्मान पुरस्कार मुख्यसंपादक इकबाल शेख, ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातपुते , उप संपादक अबरार शेख यांच्या हस्ते देण्यात आला.



महाराष्ट्र Business Katta

तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna
8623904312
Abhijeet Shukla
9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

EPFO
EPS-1995
Option Form
Before 01.09.2014
After 01.09.2014
ऑनलाईन फॉर्म आमच्याकडे भरुन मिळेल
कागदपत्र-पी.पी.ओ.नंबर, यु.ए.एन.नंबर, आधार कार्ड ( मोबाईल लिंक असणे गरजे ), ई-मेल आय., बँक पासबुक.
AADHAAR
आधार सेवा केंद्र
• जन्म तारिख • नावात बदल
• मोबाईल नंबर • पत्यात बदल
• मेल आय.डी. • लग्नानंतरचे नाव
आधार काढून १०वर्ष झाली असेल तर अपडेट करुन मिळेल.
अधिक माहितीसाठी संपर्क संचालक-दत्ता जाधव
महा ई-सेवा केंद्र
कॉमन सर्व्हिस सेंटर
आपले सरकार सेवा केंद्र
बँक ऑफ महाराष्ट्र समोर, एन-7, सिडको.
मो. 9403345739

CAFÉ ROCKSTARZ
EAT . CHILL . REPEAT
11:11
ELEVEN ELEVEN
Where Dishes come True..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे धाडसी पाऊल



डॉ.अमरकुमार आ. तायडे
मलकापूर, बुलढाणा

आधुनिक केसरी

**आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्यकर्तृत्व हे अनन्यसाधारण स्वरुपाचे आहे. त्यांच्या कार्यकर्ता महाराष्ट्राचा चेहरा मोहरा अंतर्बाह्य उजळून निघाला आहे. त्यांनी मराठी मानसिकतेला परिवर्तनवादी विचारांची नवीन दिशा दिली. त्यांच्या या नवविचारांमुळे महाराष्ट्रात सर्वस्पर्शी प्रबोधनपर्य उमे ठाकले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी येथे निर्माण केलेली प्रबोधनाची प्रक्रिया ही सर्वकष स्वरुपाची होती. येथील गतानुगतिक समाजमनाला गतिशील करणारी होती. बाबासाहेबानी निर्माण केलेली ही सामाजिक गतिशीलता केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नाही.**

त्यांच्या या सामाजिक गतिशीलतेला व्यापक स्वरुपाचे भारतीय परिमाण आहे. बाबासाहेब आंबेडकर हे अखिल भारताला तेजोभान प्राप्त करून देणारे विचारवंत होते. त्यांचे चिंतन व विचार आधुनिक भारतातील लेखन-चिंतनाचा महत्त्वपूर्ण आविष्कार होय. हा विषय जुलै१९४२ च्या दरम्यानचा आहे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे ब्रिटिश प्रधानमंत्री विन्स्टन चर्चिल सल्लागार मंडळाचे कार्यकारी सदस्य बनते होते आणि त्याच वेळी म. गांधीच्या नेतृत्वाखाली All India National Congress Party की सभा झाली. आणि त्यानी 'भारत छोडो पा ऐतिहासिक चळवळीचा ठराव पास केला ९ ऑगस्ट १९४२ ही चळवळ सुरू करण्याची तारीख निश्चित करण्यात आली. हा दिवस भारतीयासाठी तसेच ब्रिटिशांसाठी निर्णायक होता, सर्व नेत्यांना अटक करून अंदमानात मध्ये बंदी करण्याची तार ब्रिटिश प्रधानमंत्री विन्स्टन चर्चिल यानी व्हाइसरायला गेली. चर्चिल यांच्या तारेसंबंधी चर्चा करण्यासाठी जुलै १९४२ च्या शेवटी सल्लागार समितीच्या सदस्याची तातडीची बैठक झाली. सर्व राष्ट्रीय नेत्यांना अटक करून अंदमानला हद्दपार करायचे की नाही यासबंधी व्हाइसरॉयच्या मनात प्रश्न उभा होता. व्हाइसरॉयचा प्रस्ताव बाबासाहेब आंबेडकरांशिवाय सल्लागार समितीच्या इतर सर्व सदस्यांनी संमत केला होता, मुस्लीम, पारसी, ख्रिश्चन यांच्याबरोबरच लोकमान्य अणे आणि इतर उच्चवर्णीय हिंदू सल्लागार समितीचे सदस्य होते. बाबासाहेबांच्या संमतीखेरीज इतर सर्वांनी व्हाइसरायचा प्रस्ताव मान्य करून ठराव पास केला. बाबासाहेबांनी त्याच्या शक्तीनुसार या ठरावाला विरोध केला. म. गांधी, नेहरू, सरदार पटेल, बाबू राजेंद्र प्रसाद इ. राष्ट्रीय महापुरुष असल्यामुळे या राष्ट्रीय नेत्यांना हडपार करून त्यांना अंदमान किंवा सेल्शसला बंदी करून न ठेवण्याचा सल्ला दिला. नंतर ते पुढे म्हणाले की, देशाला स्वातंत्र्य प्राप्तः करून देण्यासाठी त्यांचा हा वंदनीय लडा आहे म्हणून ते देशातील लोकाचे नेते आहेत, ते गुन्हेगार किया खूनी नाहीत. त्यांना भारतातीत जेलमध्येच बंदी करून ठेवले पाहिजे. त्याचा परिणाम म्हणून



सर्व नेत्यांना अहमदनगर आणि इतर ठिकाणीच कैदी म्हणून ठेवण्यात आले. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात बाबासाहेबांनी मदत किंवा पाठिंबा दिला नाही म्हणून काही उच्चवर्णीयांनी 'ब्रिटिशांच्या हातातील एक बाहुले' अशी बाबासाहेबाची प्रतिमा रंगविली आहे, पण इतर उच्चवर्णीय बहुसंख्य लोकांना ब्रिटिशांच्या सेवेबद्दल 'सर' पदवी मिळाली होती त्यांच्यापेक्षाही बाबासाहेब हे थोर राष्ट्रवादी जाणि स्वदेशाभिमानी होते असे ऐतिहासिक नोंदी सिद्ध करतात. बाबासाहेबांच्या विरोधाने ( चर्चिल सरकार अस्वस्थ झाले पण बहुसंख्य ब्रिटिश जनता काहीशी क्रोधायमान झाली होती. त्यामुळे SC च्या पिळवणुकीविरुद्धच्या लढ्यात बाबासाहेबांना ब्रिटिशांनी पूर्ण सहकार्य दिले नाही असा त्याचा परिणाम झाला. त्यांचे प्रयत्न क्षीण करण्यासाठी ब्रिटिशानी सर्व काही केले, पण ब्रिटिशांच्या रागाची त्यांनी काळजी केली नाही. आर्थिक आणि राजकीय सत्ता प्राप्त करणारे उच्चवणीय हिंदू तसेच ब्रिटिश या दोघांविरुद्ध त्यांनी त्यांचा लढा चालून ठेवला.

त्याचा परिणाम म्हणजे राष्ट्रीय नेत्यांना भारतातच बंदी करून ठेवण्यात आले. आगाखान पॅलेस पुणे, अहमदनगर आणि नैनिताल इ. जेलमध्ये त्यांना शक्य त्या सर्व सुविधा देण्यात आल्या होत्या. हे वास्तव गांधीजींना माहीत होते. बाबासाहेबांचे राष्ट्राबद्दलचे प्रेम आणि भावना त्यांनी मान्य केली होती.

असमानतेविरुद्धच्या त्यांच्या या मोठ्या लढ्यात त्यांनी कोणाबद्दल तिरस्कार किया देव मनात बाळगला नाही हे खरे कारण होते. संपूर्ण देशाला गुलाम बनविणाऱ्या जुलमी सत्तेच्या पारंपरिक पद्धतीविरुद्ध त्यांचा लढा होता. या संदर्भात गांधीजी किंवा इतर कोणाविरुद्ध वैयक्तिक अशी कोणतीही गोष्ट नव्हती.

या देशावर आणि लोकांवर असलेल्या प्रेमाने आणि स्वदेशाभिमानाचे ३ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांचा समावेश झाला. प्रत्येकाकडून त्यांची प्रशंसा झाली. काळाच्या ओघात त्यांच्या विषयीच्या गैरसमजुतीचे ढग नाहीसे झाले आणि आज त्यांना भारताचा पहिल्या दर्जाचा नेता "किंवा मार्गदर्शक मानले जाते, त्यामुळेच एका कार्यक्रम मध्ये लावून माउंटबॅटन यांनी बाबासाहेबांचे वर्णन एक धाडसी योद्धा असे केले होते आणि ते यथार्थ आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशात एक घनघोट असा संग्राम केला त्यातूनच आधुनिक भारताची मुहूर्तमेढ रोवली गेली.

# हिंसाचार विरोधी दिन पाळण्याची गरजच काय ?



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**दहशतवादाचा फटका जगातील अनेक देशांना बसत आहे. त्यामुळे हा प्रश्न कोणत्याही एका देशाचा नाही. दहशतवाद जगात सर्वत्र वेगाने पसरत आहे. त्यामुळे जागतिक शांततेला धोका निर्माण झाला आहे. मे १९९१मध्ये काँग्रेस पक्षाच्या प्रचारादरम्यान तामिळनाडू राज्यातील श्रीपेरंबुदुर येथे सभेला संबोधित करत असताना दहशतवाद्यांनी भारताचे दिवंगत माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या घडवून आणली. या घटनेचे औचित्य साधून २१ मे हा दिवस दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस म्हणून पाळला जातो. याच दिवशी त्यांची पुण्यतिथी असते. हाच दिवस दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस म्हणून संपूर्ण देशात व जगातही पाळला जातो.**

या देशाचे सर्वात तरुण पंतप्रधान म्हणून त्यांनी सन १९८४ ते सन १९८९पर्यंत काम पाहिले. संपूर्ण जगात शांतता प्रस्थापित व्हावी व अहिंसेचा संदेश सर्वत्र पोहोचावा तसेच देशासाठी दहशतवाद विरोधात लढणाऱ्या हजारो सैनिकांच्या बलिदानाचा सन्मान करणे, भावी पिढीला मूलगामी प्रभावापासून वाचविणे, त्यांच्या मनामध्ये देशाच्या प्रगतीसाठी, संरक्षणासाठी जागरुकता निर्माण करणे, हे देखील या दिवसाचे उद्देश आहेत. या मानवनिर्मित उपद्रवी कृत्यांची जॉन क्रेटम यांनी अशी व्याख्या केली- आपल्या राजकीय मागण्या जबरदस्तीने मान्य करून घेण्यासाठी विशिष्ट समूहात आत्यंतिक भीती निर्माण करण्याच्या हेतूने एखादी व्यक्ती किंवा गट यांनी प्रस्थापित सत्तेच्या बाजूने किंवा विरोधात चालविलेला हिंसाचार किंवा निर्माण केलेला धाक म्हणजे दहशतवाद होय.

आज सर्व जगच दहशतीच्या छायेखाली सापडलेले असून कोणत्या ठिकाणी कधी हल्ला होईल ? याची सततची टांगती तलवार प्रत्येकाच्या डोक्यावर लटकत असते. कोणता मनुष्य आज सुरक्षित आहे, हे खात्रीपूर्वक सांगणे कठीण झालेले आहे. मुंबई, दिल्लीसारख्या मोठ्या शहरातील माणूस सकाळी घराबाहेर पडला, तर संध्याकाळी तो सुखरूप घरी परतेल का ? याची खात्री देता येत नाही, ही वस्तुस्थिती आहे. भारतातील दहशतवादाचा विचार केला, तर अनेक वेळा दहशतवादी हल्ले झालेले आहेत. मग तो मुंबई लोकल ट्रेनमधील साखळी बॉम्ब हल्ला असेल, सीएसटी. रेल्वेस्टेशनवर तसेच हॉटेल ताज, हॉटेल ओबेरॉय येथील हल्ला असेल. या देशाचा मानबिंदू म्हणून ज्याकडे आदराने पाहिले जाते; त्या पवित्र संसदेवर देखील अतिरेक्यांनी हल्ला केला. तसेच उरी वा पुलवामा येथे सीआरपीएफ जवानांच्या गाड्यांच्या ताफ्यावर झालेला हल्ला असेल, असे वर्षानुवर्षे दहशतवादी प्रवृत्ती हल्ले करत आहे. जम्मू-काश्मीर येथे नियमित असे हल्ले होत आहेत. त्यामुळे हजारो निरपराध नागरिक, कर्तव्यावरील भारतीय सैनिक पोलीस दल यांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.



विशेषतः दहशतवादाचे स्वरूप असे असू शकते- संघटित, नियोजित व हिंसात्मक कृती करणे, राजकीय हेतूने प्रेरित होणे, बळजबरी व धमक्या देण्यासाठी शस्त्रांचा वापर करणे, लक्ष्य हे निवडक आणि निश्चित असणे, लोकशाही विरोधी कृत्य घडविणे, मानवीहक्कांचा भंग करणे. याच गोष्टी स्थानिक ते वैश्विक स्वरूप धारण करू शकतात. यास कारणीभूत काही ढोबळ कारणे अशीः १ ) आंतरराष्ट्रीय कारणे- राजनैतिक मार्गाने उद्दिष्टे साध्य होत नाहीत म्हणून शत्रू राष्ट्रावर मात करण्यासाठी दहशतवाद अंगीकारला जातो. मूलतत्त्ववादी व धार्मिक कट्टरवादी हे दहशत निर्माण करून आपल्या उद्दिष्टांचा व धार्मिक तत्त्वांचा अंगीकार करू इच्छितात. छोट्या राष्ट्रांना बड्या राष्ट्रांबरोबर युद्ध करणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने दहशतवादाचा मार्ग त्यांना फायदेशीर वाटतो. लष्करी सामर्थ्य वाढविण्यापेक्षा दहशतवादास पाठिंबा देणे सोपे असते. उदाहरणार्थ- पाकिस्तानचा काश्मीरमध्ये चालू असलेला सरकार पुरस्कृत दहशतवाद. वाढते नागरिकीकरण व शहरीकरण यामुळे होणारा त्रास. २ ) सामाजिक कारणे- बेकारी, सामाजिक असुरक्षिततेची भावना, सुसंवादाचा अभाव, दुसऱ्याबद्दल संकुचित वृत्ती व स्पर्धात्मक भावना ठेवणे. ३ ) आर्थिक कारणे- दारिद्र्य, लुटारू वृत्ती व पैशाची हाव, अमली पदार्थाची तस्करी, आर्थिक विषमता तसेच विकासातील विषमता, काळा पैसा आदी. ४ ) राजकीय कारणे- सत्ताकांक्षा, शासनाची उदासीन प्रवृत्ती व फुटीरवादी चळवळीस प्रोत्साहन, सरकारकडून अपेक्षाभंग, राजकीय बजबजपुरी इत्यादी. ५ ) तांत्रिक कारणे- अत्याधुनिक शस्त्रे व साधने यांची सहज उपलब्धता, आधुनिक दळणवळण सुविधा व प्रगत संदेशवहन सहज शक्य होणे आदी. ६ ) इतर कारणे- लोकशाही व्यवस्थेचा अभाव, असहिष्णुता, धार्मिक व वंशिक विद्वेष इत्यादी सांगता येतील.

या व अशा उपद्व्यापामुळे मानवास भोगावे लागणारे दुष्परिणाम असे- दहशतवादामुळे सामाजिक तसेच राष्ट्राच्या सुरक्षिततेची भावना धोक्यात येते. संरक्षणावरील खर्च वाढून राष्ट्राच्या विकासाची गती मंद होते. दहशतवादी कारवायांमुळे राष्ट्राच्या संपत्तीचे अतोनात नुकसान होते. राष्ट्राच्या विकासाकडे दुर्लक्ष होते. दहशतवादाची शिकार झालेल्या बांधवांची कुटुंबेच्या कुटुंबे उद्ध्वस्त होतात. अनेक लोकांना प्राण गमवावे लागतात. एकूणच राष्ट्राची व शेवटी जागतिक सुरक्षितता भंग पावते. आजच्या स्थितीला संपूर्ण जगात ज्या-ज्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे, त्यापैकी सर्वात मोठी व अवघड समस्या म्हणजे दहशतवाद व हिंसाचार आहे. या दहशतवादामुळेच संपूर्ण जगाची शांतता भंग पावली आहे. फार मोठ्या प्रमाणावर सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या समस्येने देशाची फार मोठी आर्थिक हानी केलेली आहे. दहशतवाद व हिंसाचार याचे मूळ हे धार्मिक महत्त्वाकांक्षेत आहे. आपला धर्म हा सर्वात श्रेष्ठ आहे. त्या धर्माचा प्रचार व प्रसार व्हावा, हा यामागील सर्वात मोठा हेतू आहे. त्यासाठी अत्यंत विषारी आणि विखारी प्रचार मोठ्या प्रमाणावर केला जातो, म्हणून दहशतवाद निर्माण करणारी देशभर पसरलेली केंद्रे संपवणे व धर्मांधतेला प्रोत्साहन देणाऱ्या संस्था, संघटनांची दुकाने बंद करणे आवश्यक आहे. झटपट श्रीमंती, वजनदारपणा, अधिकार व सत्ता हस्तगत लोलुपता याही गोष्टींना हाणून पाडणे आवश्यक राहील. यासाठी जनतेने जागरूक राहून वागले पाहिजे.

# भाजपविरोधी वातावरण तयार करता येईल मात्र ईडी आणि सीडी नको

आधुनिक केसरी

राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव

देशातील भाजपाचा दक्षिणेतील एकमेव बालेकिल्ला म्हणून कर्नाटक राज्य ओळखले जात होते मात्र नुकताच कर्नाटक विधानसभेच्या २२४ जागेसाठी निवडणुक होऊन येथे काँग्रेसला १३६ जागांवर स्पष्ट बहुमत दिल्याने भाजपाचा दारुण पराभव झाला त्यामुळे देशातील आगामी राज्यातील असो अथवा लोकसभेच्या निवडणुका यामध्ये भारतीय जनता पक्षाला नक्कीच हरवू शकतो असा संदेश गेला आहे हे मात्र नक्की कर्नाटक राज्यातील काँग्रेसचे नेते जनतेच्या स्थानिक मुद्द्यांवर ही निवडणूक लढवली, अनेक नाराज नेत्यांना आपल्या गळाला लावून त्यांना काँग्रेसवासी केले,सर्वच नेत्यांची एकझुट,मनामध्ये कोणत्याही प्रकारची शंका न ठेवता एकदिलाने फक्तं आणि फक्तं भाजपाला पराभूत करणे हाच अजेंडा घेऊन प्रचाराची यंत्रणा राबविली तसेच पक्षाकडून जनतेच्या कल्याणकारी योजनांचे गॅरंटी कार्ड देवून मतदारांना हमी, सरकारबद्दल विश्वास देण्याचे काम केल्याने तसेच भाजपाची चुकीचे कारनामे उघडकीस आल्याने,अनेक जुन्याजाणत्या नेत्यांची उमेदवारी नाकारली त्यामुळे अंतर्गत वाद उफाळून याचे पर्यवसन काँग्रेसमध्ये झाले यासारख्या कारणामुळे कर्नाटकात काँग्रेसला एकहाती सत्ता मिळवण्यास बळ मिळाले आहे मात्र याचा परिणाम इतर राज्यांवर आणि लोकसभेच्या निवडणुकांमध्ये होईल हे जरी खरे असले तरी त्या - त्या राज्यांचे स्थानीक प्रश्न वेगळे आहेत, प्रादेशिक पक्षांची दिलजमाई कितपत यशस्वी होते, सत्तेवर आल्यानंतर नेत्यांच्या अटी - शर्यती पाहणे हे पण तितकेच महत्त्वाचे आहे तसेच आक्रमक आणि सर्वांना घेवून जाणाऱ्या नेत्यांच्या हाती निवडणुक जबाबदारी दिली तर नक्कीच परीवर्तन होईल असे वाटते !!



# संघराज्य व त्याचे राज्यक्षेत्र



नुरखाँ पठाण, रायगड
संपर्क क्र. : 7276526268

आधुनिक केसरी

**संविधानाविषयी अत्यावश्यक माहिती जाणून घेतल्यानंतर, आता आपण त्याच्या अंतरंगात डोकावण्याचा प्रयत्न करणार आहोत. संविधानाच्या अनुच्छेदांना एकेक करून समजून घेऊनच आपण त्याचे अंतरंग जाणू शकतो. आपणास पूर्व कल्पना आहेच की, आपल्या संविधानात '२५ भाग' '१२ अनुसुच्या' आणि '३९५ अनुच्छेद' आहेत. गरजेनुसार वेळोवेळी आपल्या राज्यघटनेत 'घटनादुरुस्त्या' होऊन या अनुच्छेदांची संख्या '४५०' च्याही वर पोहोचलेली आहे. परंतु हे वाढलेले अनुच्छेद '३९५' च्या पुढे न मांडता, आहे त्याच अनुच्छेदांमध्ये 'खंड, उपखंड' म्हणून मांडल्यामुळे आपल्या राज्यघटनेतील अनुच्छेदांची संख्या ही '३९५च' दिसते.**

**भाग-पहिला : संघराज्य व त्याचे राज्यक्षेत्र**

आजच्या भागात आपण आपल्या भारतीय संघराज्यात 'नवीन राज्यांची निर्मिती' तसेच त्यांची 'क्षेत्रे, सीमा वा नावात' फेरफार करण्यासंदर्भात तरतूद करणारे अनुच्छेद-३ पाहुया....

अनुच्छेद-३ः-नवीन राज्यांची निर्मिती आणि विद्यमान राज्यांची क्षेत्रे, सीमा अथवा नावे यांत फेरफारः

संसदेला कायद्याद्वारे-

क ) कोणत्याही राज्यापासून एखादे राज्यक्षेत्र अलग करून अथवा दोन किंवा अधिक राज्ये किंवा राज्यांचे भाग एकत्र जोडून अथवा कोणतेही राज्यक्षेत्र कोणत्याही राज्याच्या एखाद्या भागाशी जोडून नवीन राज्याची निर्मिती करता येईल.

ख ) कोणत्याही राज्याचे क्षेत्र वाढवता येईल.


ग ) कोणत्याही राज्याचे क्षेत्र घटवता येईल.

घ ) कोणत्याही राज्याच्या सीमांमध्ये फेरफार करता येईल.

ड ) कोणत्याही राज्याच्या नावांमध्ये फेरफार करता येईल.

ह्या 'अनुच्छेद-३' चा 'भावार्थ' समजून घेताना, आपल्या लक्षात येईल की, संसदेला कायदे बनवून नव्या राज्यांची निर्मिती करण्याचा, तसेच जी राज्य अगोदरपासूनच अस्तित्वात आहेत त्यांचे 'क्षेत्र' कमी वा जास्त करण्याचा, तसेच त्यांच्या 'सीमेमध्ये'च नव्हे तर 'नावा'मध्ये देखील 'फेरफार' करण्याचा अधिकार आहे.


परंतू या संदर्भात कोणतेही विधेयक संसदेत मांडण्याअगोदर त्याला 'राष्ट्रपतीं'ची पूर्वपरवानगी आवश्यक आहे. त्यानंतरच ते विधेयक संसदेच्या कोणत्याही सभागृहात मांडता येते. त्यानंतर ते विधेयक ज्या राज्याशी संबंधित आहे, त्या राज्याच्या विधानसभेकडे, त्यांचा त्या विधेयकासंदर्भात असलेला 'दृष्टिकोन' तपासण्यासाठी पाठवले जाते. परंतु त्या विधेयकासंदर्भात संबंधित राज्याचा दृष्टिकोन 'सकारात्मक' वा 'नकारात्मक' काहीही असला तरी, तो 'दृष्टिकोन' राष्ट्रपतीला तथा संसदेला बंधनकारक नाही. त्यानंतर संसदेत 'ते' विधेयक मंजूर करून, नवीन राज्याची निर्मिती वा त्या संदर्भात असलेले बदल केले जातात. भारतात १९५४ मध्ये 'राज्य पुनर्गठन आयोगाच्या शिफारशी नुसार निर्माण करण्यात आलेल्या '१४ राज्ये' व '६ केंद्रशासित प्रदेश' या सर्वांची संख्या वाढून, ते आज '२८ राज्ये' आणि '८ केंद्रशासित प्रदेश' झालेले आहेत. ही राज्ये 'अनुच्छेद-३ चा' वापर करूनच




भाग -१२

वाढलेली आहेत. पण जर का ती भारतीय राज्यक्षेत्राबाहेरची समाविष्ट केली असतील, तर त्यासाठी आपण 'अनुच्छेद-२' चा उपयोग केलेला आहे.

आता एक महत्त्वाची बाब लक्षात घ्या, की आपल्या राज्यघटनेत जेथे जेथे 'संसद कायद्याद्वारे....' असे नमूद करून एखादे काम करेल, असे सांगितले आहे; तिथे तिथे त्या वाक्याचा नेमका अर्थ काय आहे ? तर असे कायद्याद्वारे सांगितलेले काम संसद सर्वसाधारण बहुमताने करेल. ते काम करण्यासाठी संसदेला विशेष बहुमताची गरज पडणार नाही. उदा. एखाद्या राज्याच्या नावात बदल करण्यासंदर्भातले विधेयक संसदेत मांडण्यात आले आहे. ते विधेयक ज्या दिवशी संसदेत मांडले गेले, त्या दिवशी संसदेत केवळ ६० सदस्य उपस्थित आहेत. अशा वेळी जर त्या विधेयकाच्या बाजूने किमान ५०% पेक्षा अधिक म्हणजे उपस्थित ६० मतांपैकी अवघी ३१ मते जरी पडली, तरी ते विधेयक मंजूर होईल आणि संबंधित राज्याचे नाव बदलले जाईल.



# उन्हाळ्यातील मामाचा गाव धूसर... बालपण गेले कोमेजून

आधुनिक केसरी

झुक झुक झुक झुक आगिन गाडी धुरांच्या रेषा हवेत मारी पळती झाडे पाहुया मामाच्या गावाला जाऊया. ही कविता आता पुस्कातच जमा राहिली आहे. ना मामाचा गाव. ना उन्हाळ्यातील मामाच्या गावाची मौज मज्जा आता पुर्णपणे नामशेष झाली आहे.



अनिल पुरी
संपर्क क्र. : 9860887644

आमच्या लहान पणी आम्ही मामाच्या गावाकडं जाण्यासाठी फार उत्सुक असायचो, आता मात्र हे चित्र पाहावयास मिळत नाही. मामाचा गाव आणि उन्हाळ्यातील ग्रामीण खाद्य संस्कृती लोप पावत चालली आहे. समरकँमच्या नावाखाली बच्चे कंपणीचे बालपण हरवले आहे. मामाच्या गावाबदल कथा कविता सांगितल्या जायच्या उन्हाळी सुट्टीत मामाच्या गावी जाण्याची ओढ असायची. सध्याच्या मुलांना मोबाईलच्या जगामध्ये मामाच्या गावचा पुर्ण पणे विसर पडला आहे. मुलांचा मामाच्या गावा पेक्षा मामाच्या खिशातील मोबाईलकडे जास्त ओढा आहे.पुर्वी उन्हाळ्यातील सुट्या लागल्या नंतर ते शाळा सुरु होई पर्यत बच्चे कंपणीचा घरोबा मामाच्या गावाकडच असायचा.आता मात्र मामा आणि मामाचा गावा व्हिडीऔ काँलवर दिसतोय. उन्हाळ्याच्या सुट्यात पाये गावभर फिरायची. अमराई मध्ये दिवसभर खेळ खेळले जायचे. सुरपारंबी, विटीदांडु, गोट्या, लगोरी, डफ, अशा खेळांची मज्जाच काही और होती.दिवस दिवस मुंल नदीच्या डबकडातून बाहेर येत नव्हती.पोहणे हा तर आवडीचा विषय असायचा. एकमेकांच्या अंगाला चिखल लाऊन चिखलाचे गोळे एकमेकांना मारत नदीत सुर मारला जायचा. सध्याच्या ग्लोबल युगात तो सुर हरवला असून या आनंदाचा शोध मुले आता मोबाईल मध्ये घेताना दिसत आहेत.समरकँम या मोठ्या जड नावाखाली मुलांच बालपण एका चौकटीतच धूसर होत चाललं आहे.क्लासेस,उन्हाळी शिबिर टुर.अश्या जड नावाखाली मुलांचे बालपण कोमेजून गेले आहे.अनेकांना तर मामाचा गावाच माहित नाही. गावाकडील ग्रामीण खाद्य संस्कृती काही वेगळीच असायची.त्यांची नावे पण आत्ताच्या मुलांना कदाचित माहीत नसावीत.माडग,वरणफळ, कोंडुळे,शेंगुळे,धिरडे,गूळ पट्टी,घुग्र्या,अश्या ग्रामीण भागातील घरगुती खाद्य पदार्थाची चव आजच्या ग्लोबल जगात वावरणाऱ्या मुलांना माहीतच नाही.त्यांना आँनलाईन येणारा पिझ्झा. बर्गर,समोसा,वडापाव,ईडली,दोसा,कींडरजाँय,कँडबरी,ही त्यांची आताची आहेत आवडीची खाद्य संस्कृती आहे.गावाकड पिकऊन खालेल्या आंब्याची चव बच्चे कंपणी आता माझा,स्लाइस. मध्ये शोधत आहेत.त्यांत कमी पडलय म्हणून वेगवेगळ्या कंपनीची शितपेय आहेतच दिमतीला. मुलांना पेट्या मधुन घेणारी आंबे माहीत आहेत पण गावाकडील आंब्याची नाव पण कदाचित मुलांना आता माहित नाहीत एकाच अमराईत केळ्या,गोट्या, रसाळ्या,भोपळ्या,शेप्या अश्या आंब्याच्या वेगवेगळ्या जाती आणि नावे असायची हे आताच्या मुलांना एका कथे सारखे वाटते. त्यामुळे पळती झाडे पाहुया आणि मामाच्या गावाला जाऊला हे कवीने रंगवलेले चित्र आता पुस्तकातील शब्दा पुरतेच मर्यादित राहिले आहे.गाव कुसातला मामा आणि मामाचा गाव ही संकल्पनाच आता कागदावर अधोरेखित करण्यासाठी शिल्लक राहिली आहे,असे असले तरी लहान पण पुन्हा यावे पुन्हा मामाच्या गावाला जावे असे मात्र कायम मनात वाटतच राहाणार.



# पाकिस्तान आग मे जलता रहेगा



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**जेव्हापासून पाकिस्तान भारतापासून वेगळा झाला तेव्हापासुन त्यांच्या रक्तात भारतात विरूध्द कुरापती सुरूच आहे.त्याचेच प्रायश्चित्त वेगवेगळ्या रूपाने पाकिस्तान पदोपदी कोणत्या ना कोणत्या पद्धतीने भोगत आहे.कारण पाकिस्तान आतंकिस्तान झालेला आहे. आज जगासाठी पाकिस्तान आतंकवाद्यांचे माहेरघर बनल्याचे सर्वांनाच चांगल्याप्रकारे ग्यात आहेच. त्यामुळे पाकिस्तानातील अंतरकलह दिवसेंदिवस कमी न होता वाढतच आहे आणि पुढेही वाढत रहाणार यात दुमत नाही.कारण जैसी करनी वैसी भरणी ही म्हण पाकिस्तानला बरोबर फीट होत आहे. पाकिस्तान भारताविरुद्ध जितके खड्डे खोदण्याचा प्रयत्न करेल त्याच्या शंभर पटीने पाकिस्तानात आपोआप खड्डे पडल्याचे आपल्याला दिसून येईल.**

ही बाब संपूर्ण जग उघड्या डोळ्यांनी पाहत आहेपाकिस्तानने भारतात विरूद्ध आंतरराष्ट्रीय स्तरावर कितीतरी वेळा चिखलफेक करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचे संपूर्ण मनसुबे निष्फळ ठरले आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तानची अनेकदा नामुष्की सुध्दा झाली.माजी पंतप्रधान इम्रान खान यांना अटक होताच संपूर्ण पाकिस्तान पेटुन उठला आणि सर्वत्र जाळपोळ,आगजणी, तोडफोड अशा प्रकारे गृह युद्ध सुरू झाले.यात मोठ्या प्रमाणात जीवीत व वित्तीय हाणी सुध्दा झाली.पाकिस्तान जेव्हापासुन स्वतंत्र झाला तेव्हा पासून फक्त नावापुरताच लोकशाहीचा देश रहाला.खऱ्या अर्थाने पाकिस्तान आतंकिस्तान झालेला आपल्याला दिसून येते. कारण पाकिस्तानाचा संपूर्ण कारभार पाकिस्तानी लष्कराच्या हातात असतो. पाकिस्तानचा इतिहास आहे की ज्याला प्रधानमंत्री बनायचे असेल त्याला लष्कर प्रमुखासमोर शरणागती पत्करावीच लागते. पाकीस्तानमध्ये आतापर्यंत जीतकेही प्रधानमंत्री झाले त्यांना जेलमध्ये टाकून किंवा भ्रष्टाचाराचे आरोप लावुन किंवा त्याची कोणत्या ना कोणत्या कारणाने हत्या करून आतापर्यंतच्या प्रधानमंत्र्यांनी सत्ता हस्तगत केली आहे व प्रधानमंत्र्याच्या खुर्चीवर बसलेले दिसुन येतात.त्यामुळे जगात आज पाकिस्तानचा स्तर घसलेला आहे.जगात पाकिस्तान सामाजिक, राजकीय, आर्थिकदृष्ट्या,विदेश निती या संपूर्ण बाबतीत रक्ताने लथपथ झालेला आहे. त्यामुळे पाकिस्तानने रक्ताच्या लाथोळ्यातुन कितीही बाहेर निघायचा प्रयत्न केला तरीही हीबाब शक्य नाही. कारण त्यांनी आतापर्यंत केलेले पाप भोगत आहे व त्याने केलेल्या पापाचा घडा हळूहळू भरतांना दिसत आहे.त्यामुळे आज जागतिक पातळीवर पाकिस्तानची परिस्थिती "ना घर का ना घाट का " अशी झाली आहे. पाकिस्तानमधील इम्रान खान यांच्या विरोधातील कारवाई म्हणजे देशातील जटील समस्या लपविण्यासाठी कारवाई सुरू असल्याचे दिसून येते. मुख्यत्वेकरून पाकिस्तानमध्ये परंपरा आहे की दोषी प्रधानमंत्री किंवा मंत्री एकतर जेलमध्ये रहातो किंवा विदेशात पलायन करून आपली संपूर्ण राजकीय सुत्रे चालवीत असतो.आपण गेल्या 76 वर्षांपासून पहात आहोत की पाकिस्तानमध्ये सत्तेसाठी सर्वच राजकीय पक्ष एकामेकांच्या रक्ताचे भुकेले असतात. त्यामुळे पाकिस्तानचा इतिहास आहे की हत्याकरून किंवा जेलमध्ये टाकूनच नवीन प्रधानमंत्री बनलेला आहे. त्यामुळे पाकिस्तान रक्ताच्या लाथोळ्यात व आगीच्या ज्वालेत भस्मसात होतांना दिसतो.माजी प्रधानमंत्री इम्रान खान यांना जेलमध्ये टाकण्यासाठी व कठोर कारवाईसाठी नवाज शरीफ लंडनमधुन रिमोटने काम करीत आहे.पाकिस्तानच्या राजकारणात केव्हाही करवट बदलू शकते.माजी प्रधानमंत्री नवाज शरीफ यांची इच्छा आहे की प्रधानमंत्री शहबाज शरीफ यांना हटवून आपल्या मुलीला प्रधानमंत्री बनवावे.कारण



नवाज शरीफ आपल्या दिवंगत पत्नी कुलसुम यांची शेवटची इच्छा पुर्ण करण्यासाठी आपल्या मुलीला पुढचा प्रधानमंत्री बनण्याची इच्छा आहे.याकरीता इम्रान खानवर आर्मी एक्टच्या अंतर्गत कोर्टकारवाईची तयारी सुरू केली असून यात सजा-ए-मौत ही सजासुध्द संभव आहे. कारण इम्रान खानच्या ( पीटीआई ) च्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पाकिस्तानी सेनेला टार्गेट केले होते.यामुळे सेनेचे मोठे नुकसान झाले.याकरीता इम्रानला आजीवन कारावास किंवा मृत्यू दंड होवू शकतो.पाकिस्तानच्या इतिहासात ही पहिली घटना आहे की रावळपिंडी सेना मुख्यालयावर राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केला व तोडफोड केली असावी, त्याचप्रमाणे लाहोर येथील कोर कमांडर हाउसमध्ये आग सुध्दा लावली. यामुळे इम्रान खानवर आर्मी एक्टच्या अंतर्गत मृत्यू दंडाची टांगती तलवार मंडरावतांना दिसत आहे.

# पंचांगकर्ते, हवामान तज्ज्ञांचा अंदाज खरा ठरणार का ?

## उन्हाचा पारा ४२ अंशावर : अवकाळीचा कहर, खरिपाच्या पेरणीसाठी वेळेवर येईल का ?

आधुनिक केसरी न्यूज

**सुधारक जेठे**

**फुलंब्री :** आडगाव बुद्रुक - यंदा एप्रिल महिन्यात अवकाळी पावसाने कहर करून शेती व पशुधनाचे मोठे नुकसान झालेले असताना पावसाळ्यात खरिपाच्या पेरणीसाठी वेळेवर पाऊस पडून खरिपाच्या पेरण्या लवकर होतील का ? अशी शेतकरी वर्गात मोठी चर्चा सुरू आहे. एप्रिल महिन्यात व मे मध्ये तालुक्यातील सर्व मंडळात मिळून जवळपास ६०० मि. मी.( अंदाजे ) एवढा पाऊस झाला होता. या मुसळधार पावसामुळे शेती व पशुधनाचे मोठे नुकसान झाले होते. एवढा मोठा पाऊस पावसाळ्यात कधीही झाला नव्हता.आता तर आडगाव व परिसरातील पारा हा ४२ अंशावर जाऊन ठेपला आहे. त्यामुळे यंदा पावसाळ्यात लवकर पाऊस होऊन खरिपाच्या पेरण्या लवकर होतील कारे बा ?अशी शेतकरी वर्गात चर्चा सुरू आहे. यावर्षी अवकाळी पावसाने रब्बी हंगामातील पिकांचे नुकसान केले आहे. शिवाय, आंबा,चिकू,सीताफळ आदी फळबागांचे नुकसान झाले. पावसाळ्या प्रमाणात अनेक भागात जोरदार पाऊस झाला. त्यामुळे पेरणीच्या वेळी पाऊस पडेल का, अशी शंका उपस्थित होत आहे.

**८ जूनला होणार मृग नक्षत्राची सुरुवात :** यंदाच्या शोभन नाम संवत्सरात मेघाचा निवास परिटाचे ( रजकाचे ) घरी असल्यामुळे पाऊस पुष्कळ प्रमाणात होऊन धन धान्यांची समृद्धी होईल . हे वर्ष एकंदरीत चांगले असणार आहे . मात्र सोसाट्याचे वारे सुट्न संकटे उद्भवतील धान्यांची, धनाची नासाडी होऊन घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार असल्याचा अंदाज पंचांगकर्ते व हवामान तज्ज्ञाने वर्तविला आहे . यंदा गूळ, तूप, मध कमी प्रमाणात मिळणार आहे . तसेच मणी, मोती, सोने महाग महाग होणार आहे . जनावरे आनंदात राहणार आहेत . त्यांच्याकडून दूध, दुभते भरपूर मिळणार आहे . धार्मिक कार्यक्रम वाढत जातील . शेतकरी हवालदिल न होता सुखात व आनंदात राहतील असा अंदाज दाते व अन्य एका पंचांगकर्त्याने वर्तवला आहे . तर अन्य तिसऱ्या एका पंचांगकर्त्याने पावसाचे मान निराशाजनक असून, काही ठिकाणी ओल्या तर काही ठिकाणी सुक्या दुष्काळाला तोंड द्यावे लागेल शेती व पिकाविषयीचे अंदाज चुकतील . जीवनावश्यक वस्तूंची टंचाई जाणवेल व रोगराईचे प्रमाण वाढेल असा अंदाज वर्तवला आहे . मान्सूनच्या पावसाला १५ जूनपासून सुरुवात होईल . ८ जून रोजी मृग नक्षत्रास सुरुवात होणार असली तरी २२ जूननंतर पावसाला सुरुवात होऊन खरिपाच्या पेरण्यांना सुरुवात होणार आहे . आक्टोबर २०२३ पर्यंत भरपूर पाऊस होणार असल्याचा अंदाज पंचांगकर्त्यांनी वर्तवला आहे .



**२०२३ मध्ये चांगला पाऊस होणार : पंजाबराव डक**

प्रत्येक भूभागाला एकच समुद्र आहे . मात्र महाराष्ट्राच्या बाजूला अरबी व बंगालच्या खाडीचे असे दोन समुद्र आहेत . त्यामुळे महाराष्ट्रात दरवर्षी ७ जूननंतर पाऊस होतोच . समुद्रातील इलनिनो व लालीना या समुद्रातील प्रक्रिया आहेत . सध्या समुद्रात इलनिनोची प्रक्रिया सुरु आहे . यामुळे दुष्काळ पडतो . अशी अफवा सध्या सुरु आहे . शेतकऱ्यांनी या अफवेवर विश्वास ठेवू नये . २०२३मध्ये चांगला पाऊस होणार आहे . शेतकऱ्यांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन हवामान तज्ज्ञ पंजाबराव डक यांनी केले आहे .

# डॉ. माधव बसवंते यांची महाराष्ट्र शासनाच्या रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळावर

आधुनिक केसरी न्यूज



**नांदेड :** महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिक, समीक्षक व संशोधन मार्गदर्शक डॉ. माधव ग्यानोबा बसवंते यांची महाराष्ट्र शासनाने पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत असलेल्या रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळावर अशासकीय सदस्य म्हणून तीन वर्षांसाठी शासन निर्णयाद्वारे नुकतीच नियुक्ती केली आहे. डॉ.माधव बसवंते यांनी यापूर्वी महाराष्ट्र शासनाच्या नांदेड जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्य व महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळावर मराठी विषयाचे अभ्यासगट सदस्य म्हणूनही काम केलेले आहे. डॉ. माधव बसवंते हे सध्या मुदखेड जि.नांदेड येथील राजीव गांधी महाविद्यालयात मराठी विषयाचे प्रोफेसर व मराठी विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. डॉ.माधव बसवंते यांनी गेल्या तीन दशकापासून महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व संशोधनाच्या क्षेत्रात आपली स्वतंत्र नाममुद्रा निर्माण केलेली आहे. उपयोजित मराठी, मातंग समाजः इतिहास आणि वास्तवता, होऊ आम्ही स्वयंसिद्धा, उद्ध्वस्त अवकाश, महाराष्ट्रातील संतकवयित्री यासारखी ग्रंथसंपदा व त्यांचे इतरही अनेक वैचारिक लेख महाराष्ट्रातील प्रतिथयश वृत्तपत्रांतून प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक प्रतिष्ठित सेवाभावी संस्थांनी अनेक राष्ट्रीय व राज्य पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. डॉ. माधव बसवंते हे पीएच. डी. पदवीचे संशोधन मार्गदर्शक व महाराष्ट्रातील विद्यापीठातील पीएच.डी. शोधप्रबंधाचे बहिःस्थ परीक्षक असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. डॉ.माधव बसवंते हे मूळचे मौजे तळेगाव ता.उमरी जि.नांदेड येथील ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील आहेत. डॉ.माधव बसवंते यांची महाराष्ट्र शासनाने रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळावर नांदेड जिल्ह्यातून एकमेव अशासकीय सदस्य म्हणून नुकतीच शासन निर्णयाद्वारे नियुक्ती केल्यामुळे त्यांच्यावर अनेक प्रशासकीय अधिकारी, प्राध्यापक, समाजसेवक, विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते, सांस्कृतिक व शैक्षणिक संघटनांचे विविध पदाधिकारी, पत्रकार, साहित्यिक, मित्रपरिवार व विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



# राष्ट्रवादी काँग्रेसच्या लोहा तालुकाध्यक्षपदी माजी नगरसेवक रमेश माळी यांची नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या लोहा तालुकाध्यक्ष पदी सामाजिक कार्यकर्ते तथा माजी नगरसेवक रमेश माळी यांची नियुक्ती करण्यात आली असून निवडीचे पत्र आज ( दि.१७ ) मे २०२३ रोजी नांदेड येथे पक्षाच्या पार पडलेल्या बैठकीत जिल्हाध्यक्ष हरिहरराव भोसीकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करून नियुक्तीपत्र दिले.

यावेळी सदरील बैठकीस जिल्हाउपाध्यक्ष विक्रम देशमुख, जिल्हा सरचिटणीस डी.पी. जांभरुणकर, महिला जिल्हाध्यक्ष प्रांजलीताई रावणगावकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भगवानराव पाटील आलेगावकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे लोहा तालुका अध्यक्ष शिवराज पाटील पवार,राष्ट्रवादी बुथ कमिटीचे तालुकाध्यक्ष मनोहर पाटील पवार आदींची उपस्थिती होती.

माजी नगरसेवक रमेश माळी यांनी सन २००९ ते २०१३ कार्यकाळात शिवसेनेचे माजी आमदार रोहिदास चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली लोहा न.पा.चे नगरसेवक म्हणून कार्यकाळ अतिशय उत्कृष्ट रित्या काम केले. वंचित बहुजन संघर्ष विस्थापित आघाडीच्या वतीने नगराध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून २०१८ मध्ये निवडणूक लढविली परंतु पराभव पत्करावा लागला.तरीही समाजसेवेचा वसा सोडला नाही. माजी उपमुख्यमंत्री छगनजी भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली समाजसेवेच्या माध्यमातून महात्मा फुले समता परिषदेचे लोहा तालुकाध्यक्ष पदाची धुरा अजूनही सांभाळत आहेत. रमेश माळी यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या लोहा तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल जिल्हा कार्यकारिणी, तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे, तालुका युवक काँग्रेस पार्टीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते मित्रमंडळी सह आदीं कडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे



# शासन आपल्या दारी उपक्रमास प्रतिसाद

## आ.नारायण कुचे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**रामदास पटेकर**

**अंबड :** शासन आपल्या दारी या योजने अंतर्गत अंबड तालुक्यातील सर्व विभागातील लाभार्थी यांचा मत्स्योदरी देवी संस्थान राजमाता अहिल्यादेवी होळकर बहुद्देशीय हॉल अंबड येथे विविध योजनेचा मेळावा आ.नारायण कुचे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. या मेळाव्यात सर्व शासकीय स्टॉल लावण्यात येऊन उपस्थिताना शासकीय कामाची माहिती देण्यात आली. तसेच विविध योजनेचे प्रमाणपत्र तसेच धनादेश वाटप करण्यात आले. यावेळी समृद्धी कारखान्याचे चेअरमन तथा भाजपा नेते सतिश घाडगे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष दिपकसिंह ठाकूर, भाजपा जिल्हा सरचिटणीस अवधुत नाना खडके, उपविभागीय अधिकारी बि. जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके, कृषी उपविभागीय अधिकारी रोडगे, तालुका कृषी अधिकारी सचिन गिरी,गटविकास अधिकारी विवेक जमधडे,भाजपा तालुका अध्यक्ष जितेंद्र पालकर,औदुंबर बागडे,गटनेते अरुणभाऊ उपाध्ये, जिल्हा कामगार अधिकारी अमोल जाधव,जिप सदस्य नंदकिशोर पिंगळे यांच्यासह तालुक्यातील सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी शेतकऱ्यांना कृषी विभाग पोखरा योजने अंतर्गत हार्वेशटर, ट्रॅक्टर, मिनी ट्रॅक्टर, मिनी पावर ट्रेलर, पेरणी टोकण यंत्र, माल वाहतूक शीत वाहण, श्रावण बाळ, संजय गांधी निराधार योजने अंतर्गत लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप, सामाजिक वनीकरण विभाग अंतर्गत बांदावरील वृक्ष लागवडीच्या लाभार्त्यांना नवीन कार्यारंभ आदेशाचे वाटप, कुशल पेमेंट धनादेशाचे वाटप, शेतकऱ्यांना वृक्ष वाटप, पशुसंवर्धन विभागाअंतर्गत जनावरांना हिरवा चाऱ्यांसाठी बियानाचे वाटप, कडबा कुट्टी मशीन चे कार्यारंभ आदेशाचे वाटप, मानव विकास अंतर्गत शाळेतील मुलींना सायकल वाटप करण्यात आल्या, सहकार विभागांतर्गत कर्ज माफी योजनेची माहिती लाभार्थ्यांना देण्यात आली, आयुष्यमान भारत योजनेचे कार्ड वाटप करण्यात आले, अंबड नगर परिषद यांनी वाटप केलेल्या अनुदान मधून व्यवसाय सुरू करण्यात आलेल्या गृह उद्योगातून निर्माण करण्यात आलेल्या वस्तूच्या विक्री स्टऑलचे उदघाटन करण्यात आले. आरोग्य विभागांतर्गत मानव विकास कार्यक्रम अंतर्गत बुडीत मजुरी लाभ,जन्म प्रमाणपत्राचे वाटप, महिला बालविकास अंतर्गत कौटुंबिक हिंसाचाराच्या तक्रारी निवारण, बाल संगोपन योजनेची माहिती, बेबी केअर किट योजना, माझी कन्या भाग्यश्री योजना, बेटी बचाव बेटी पाढाव योजना विषयी माहिती देऊन लाभार्थ्यांना याचा लाभ देण्यात आला, तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्ती समस्या , समाधान शिबीर राबवण्यात आलेण् यावेळी रमेश शहाणे, भाजपा युवा नेते विश्वजित दादा खरात, सौरभ कुलकर्णी, संदीप खरात, द्वारकदास जाधव, बाळासाहेब तायडे, श्रीराम नागरे सर, विठ्ठलसिंह राणा, सुरेश गुडे, डॉ.राहुल डोंगरे फेरोज शेख, राजू दादा सावंत, बाळू शहाणे, डॉ.साईनाथ उकिर्डेसर्व प्रमुख पदाधिकारी कार्यकर्तेउपस्थित होते.

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या

स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
- मासिक पाळी अनियमित असणे
- हॉर्मोन्स चे असंतुलन
- मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
- PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
- मासिक पाळी बंद होणे
- वारंवार गर्भपात होणे
- श्वेत प्रदर (पांढरे जाणे)

पुरूषांना होणाऱ्या समस्या
- शुक्राणु कमी असणे
- शुक्राणुची गती कमी असणे
- शुक्राणु स्खलन
- स्वप्न दोष
- सेक्स इच्छा कमी होणे इ.

फीस - 300 रू.

संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सल्टींग उपलब्ध


पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.

# वेरूळ येथे एनएसजीचे मॉकड्रिल



आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** वेरूळ येथील जगप्रसिद्ध लेणी व परिसरात असलेल्या वेरूळ पर्यटन अभ्यागत केंद्रा मध्ये राष्ट्रीय सुरक्षा दल अर्थात NSG ची ड्रिल सुरू असून एनएसजीचे कमांडोंच्या चित्त थरारक संचलनाद्वारे येथे असलेल्या पर्यटकांमध्ये कुतूहल निर्माण झाले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, एनएसजी कमांडो च्या वार्षिक मॉकड्रिल साठी यंदा वेरूळ लेणी व परिसराची निवड करण्यात आली असून हा भाग अतिशय संवेदनशील आणि जागतिक स्तरावर असल्याने येथे आली आहे. तसेच या ड्रिलमध्ये एनएसजीचे 120 कमांडो सहभागी झाले आहेत. येथे असलेल्या पर्यटन अभ्यागत केंद्रात आपत्कालीन परिस्थिती तयारी व आढावा, तसेच लष्कराच्या हेलिकॉप्टर मधून उतरणे व चढणे त्याचप्रमाणे लेणी परिसरात आपत्कालीन परिस्थितीत कशी तयारी करावी यासंदर्भात ही मॉकड्रिल आयोजित करण्यात आली होती. यावेळी आपत्कालीन परिस्थितीत तयारीसाठी दोन अग्निशमन बंब, वैद्यकीय सुविधेसाठी ॲम्बुलन्स तसेच स्थानिक खुलताबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भुजंग हातमोडे व त्यांचे सहकारी कलीम शेख, महसूल प्रशासनाच्या वतीने तहसीलदार सुरेंद्र देशमुख, मंडळाधिकारी श्रीमती भाग्यश्री दुतोंडे, व बी.बी.देशमुख यांची उपस्थिती होती.




# 'स्वरसागर' ग्रंथाला 'मसाप'चा पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** 'स्वरसागर' या हिंदी चित्रपट संगीतातील गायकांवर चित्रपट संगीताचे अभ्यासक स्वप्निल पोरे यांनी लिहिलेल्या ग्रंथाला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा अपर्णा मोहिले पुरस्कृत 'सतीशचंद्र मोहिले स्मृती पुरस्कार' जाहीर झाला आहे. रोख रक्कम आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे. परिषदेच्या ११८ व्या वर्धापन दिनानिमित्त दि. २६ मे २०२३ रोजी सकाळी ११ वाजता एस. एम. जोशी फाऊंडेशनमध्ये होणाऱ्या सोहळ्यात ज्येष्ठ इतिहासकार डॉ. रामचंद्र गुहा यांच्या हस्ते व 'मसाप'चे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्कार वितरण होईल.

ग्रंथ पुरस्कार विजेत्यांमध्ये एअर मार्शल भूषण गोखले, मुकुंद संगोराम, माधव वझे, राजू बाविस्कर, डॉ. शिरीष भावे, यशोदा वाकणकर, डॉ. मानसी फडके, प्रतिभा जगदाळे, सचिन पाटील, प्रा. हनुमंत पवार, डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. मंदा खांडगे, डॉ. स्वाती कर्वे, डॉ. कल्याणी दिवेकर, डॉ. विद्या देवधर, डॉ. कीर्ती मुळीक, डॉ. वर्षा तोडमल, डॉ. मधुकर क्षीरसागर, डॉ. शिवाजीराव देशमुख, आरती देवगावकर, अशोक इंदलकर, डॉ. स्मिता दातार व अन्य लेखकांचा समावेश आहे, असे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी कळवले आहे.

# लहान बाळाच्या मदतीला धावले युवा पँथर...!

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यातील गरताड गावातील भास्कर देवरे ह्या सेंट्रींग कामगार यांना मूल झाल्यानंतर सात दिवसांनी त्या मुलाला कावीळ झाले व तात्काळ त्याला शहरातील वरदान हॉस्पिटल येथे ॲडमिट केले. ॲडमिट केल्याच्या तीन दिवसांनी तब्बल 30,350 रुपये बिल झाले मुलाच्या आई-वडिलांची परिस्थिती खूप बिकट असल्याने हे बिल पाहून संपूर्ण परिवार चिंतेचे वातावरण निर्माण झाले. मुलाचे वडील भास्कर देवरे हे गरीब सेंट्रींग मजूर असून त्यांची परिस्थिती खूप खराब आहे. तीन दिवसांनी एवढे बिल झाले म्हणून पुढील उपचार तात्काळ थांबवला व सरकारी हॉस्पिटल येथे बाळाला नेण्याचा निर्णय घेतला परंतु वरदान हॉस्पिटल येथे एवढे बिल झाल्याने एवढे पैसे आणायचे कुठून अशी चिंता वाढली. परंतु काही वेळात युवा पँथरचे शंकर अण्णा खरात यांना फोन करून बोलावले असता शंकर खरात यांनी त्यांचे स्थानिक मित्र सहकारी विनोद केदार, आकाश बागुल व नागिन मोरे यांना सोबत घेऊन त्या हॉस्पिटलच्या डॉक्टरांशी भेट घेतली व तात्काळ ते बिल कमी करून ३० हजार न भरता फक्त 14 हजार भरण्यासाठी सांगितले. तब्बल 50 टक्के बिल कमी करून त्या परिवाराला खूप मोठी आर्थिक मदत झाली आहे व त्यांनी सर्व युवा पँथरचे आभार मानले.



# माधव हानमंते यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** अनंत बहुउद्देशीय सेवा संस्थेच अध्यक्ष एस्. एच. बेग यांनी हा राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पत्रकारिता धर्माबाद येथील सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार माधव हानमंते यांना जाहीर केला आहे. हा पुरस्कार १७ मे २०२३ रोजी प व्ही स्टार हॉटेलमध्ये प्रदान करण्यात आला असून माधव हानमंते यांचे धर्माबाद येथे गेली 15 वर्षापासून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य असल्याने त्यांच्या कार्याचा आदर्श घेण्यासारखा आहे तसेच जनजागृती पर उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून बुधवार दिनांक १७ मे २०२३ रोजी सकाळी ११ वाजता अहमदनगर येथील व्ही स्टार हॉटेलमध्ये त्यांना आमदार राम शिंदे. आमदार संग्राम जगताप व जेष्ठ पत्रकार सातपुते.संपादक एकबाल शेख व विविध राजकीय व सामाजीक मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. माधव हानमंते यांना यापूर्वी ही त्यांना त्यांच्या



सामाजिक कार्याची दखल घेऊन आठ पुरस्कार मिळालेले आहेत.महात्माफुले गौरव पुरस्कार सैफ अली बाबा उर्स कमेटी धर्माबाद, एन टिव्ही रत्न पुरस्कार, अहमदनगर एन टिव्हीशोध पत्रकारिता पुरस्कार अहमदनगर.करखेली दर्गा कमेटी पुरस्कार करखेली.कोरोना योध्दा पुरस्कार, शिक्षक संघटनेच्या वतीने कोरोना योध्दा पुरस्कार समाजसेवक पुरस्कार व इतर असे एकुण आठ पुरस्कार मिळाले आहेत. त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा पोलिस निरीक्षक सुर्यमोहन बोल्लमवाड, पोलिस निरीक्षक मोहन भोसले, वंचित बहुजन आघाडीचे सल्लागार जे.के. जोधंळे, पत्रकार संघाचे अध्यक्ष जि.पी.मिसाळे, जेष्ठ पत्रकार सजंय कदम, पत्रकार संघाचे अध्यक्ष गंगाधर धडेकर, पत्रकार कृष्णा तिम्मापुरे. सुदर्शन वाघमारे, सिंहनाद युवक प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनुपकुमार कासलीवाल, पोतन्ना लखमावाड, लक्ष्मण तुरेराव, लक्ष्मन पाटील येताळे, नॅशनल खेळाडू पोलिस कॉ. संतोष अनेराय] नॅशनल खेळाडू पोलीस कॉ. शेख शब्बीर, अहमद लढा, शेख सलिम, हिंदु युवा संघटनाचे अध्यक्ष सतिश मोटकुल, संतोष येरावार, येल्लपा, अमित मुंदडा, चेतन सोनी यांनी दिल्या.

# शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना दक्षता घ्यावी; कृषी अधिकारी भारत कासार

## दुकानांच्या तपासणीसाठी भरारी पथक तैनात अचानक टाकणार धाडी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना



काळजी दक्षता घ्यावी तसेच गुणवंता आणि हमी देणाऱ्या आधीकृत विक्रत्याकडूनच बियाणे खरेदीस प्राधान्य द्यावे असे आव्हान कृषी विभागातर्फे तालुका कृषी अधिकारी भारत कासार यांनी शेतकऱ्यांनी बनावट भेसळयुक्त बियाणे खरेदी टाळण्यासाठी अधिकृत विक्रेत्याकडूनच खरेदी करावे दिलावर बियाण्याचा संपूर्ण तपशील यात पिकवान संपूर्ण लॉट नंबर बियाणे कंपनीचे नाव किंमत आणि आपण स्वतःवर स्वाक्षरी अंगठा देऊन विक्रेत्यांची स्वाक्षरी असल्याबाबत खात्री करावी बियाण्यांचे वेष्टन, पिशवी, टॅग, खरेदीचे देयक आणि थोडे बियाणे पिकाची कापणी होईपर्यंत जपून ठेवावे. खरेदी केलेले बियाणे त्या हंगाम साठी शिफारस केलेले असल्याची खात्री करावी. भेसळीची शंका दूर करण्यासाठी बियाण्याची पाकीटे, बॅग सिलबंद, मोहोरबंद असल्याची खात्री करावी. बियाणे उगवणीच्या खात्रीसाठी पाकीट, बॅगवरील अंतिम मुदत पाहून घ्यावी. कमी वजनाच्या निविष्ठा तसेच छापील किंमतीपेक्षा जास्त किंमतीने विक्री अथवा इतर तक्रारीसाठी नजिकच्या फुलंब्री कृषी तालुका विभागाकडे करावी तसेच त्यांचे नाव गुपित ठेवण्यात येईल कृषी अधिकारी भारत कासार अशी होणार चौकशी कृषी निविष्ठांचा दर फलक अद्यावत केलेला आहे का, वैध परवाने दर्शनीस्थळी लावलेले आहेत का, वजन काटा वैद्यमापन शास्त्र विभागाकडून प्रमाणित केला आहे का, सर्व स्टॉक रजिस्टर अद्यावत आहेत का, कंपनीकडून सर्व निविष्ठा खरेदीचे बिल अद्यावत आहेत का, शेतकऱ्यांना विहित नमुन्यात खरेदी बिल दिली जातात का, खरेदी बिलावर शेतकऱ्यांची स्वाक्षरी आहे का, पॉश मशीनद्वारे खताची विक्री केली जाते का, परवान्यात नमूद केलेले गोडाऊनच वापरले जाते का, सर्व कृषी निविष्ठांचे उगम प्रमाणपत्र दुकानात उपलब्ध आहे का याप्रकारे दुकानांची चौकशी होणार असल्याचे संबंधित विभागाने सांगितले आहे.

# बी-बियाणे खरेदीसाठी शेतकऱ्यांना सोयगाव कृषी विभागाचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांना बी-बियाणे खरेदीबाबत शेतकऱ्यांना कृषी विभागाचे आवाहन खरीप हंगाम जवळ येत असल्याने सोयगाव तालुक्यातील शेतकरी शेतीची मशागत करण्याच्या लगबघीला लागले आहेत. खरीप हंगामात मुबलक प्रमाणात खते आणि बी बियाणे कृषी विभागाकडून उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी खते व बियाणे खरेदी करताना काळजी घेण्याचे आवाहन तालुका कृषी अधिकारी एस जी वाघ सोयगाव यांनी केले आहे. खते आणि बियाणांची कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये म्हणून कृषी विभागाने भरारी पथकांची नियुक्ती केली आहे. बोगस बियाणे विक्रेत्यांवरही या पथकांची करडी नजर राहणार आहे. शेतकऱ्यांनी पेरणीचे नियोजन युद्धपातळीवर सुरू केले आहे. या वर्षी तालुक्यात सुमारे 42 हजार हेक्टरवर खरिपाच्या पेरणीचे नियोजन आहे. यासाठी शेतकऱ्यांनी येणाऱ्या खरीप हंगामात खते बी बियाणे खरेदी करण्यासाठी आवश्यक काळजी घेण्याचे आवाहन सोयगाव कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.



बियाणे खरेदी करताना पाकिटावरील मुदतीची खात्री करावी . एमआरपी दरापेक्षा जास्त दराने बियाणे खरेदी करू नये, बियाणे खरेदीची पावती, वेस्टन बॅग व त्यावरील लेबल टॅग, तसेच मूठभर बियाणे इ . जपून ठेवावे . छापील किमतीपेक्षा अधिक दराने विषाणे विक्री होत असल्यास जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, कृषी विकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, कृषी अधिकारी कार्यालय तसेच कृषी अधिकारी पंचायत समिती यांच्याकडे लेखी स्वरूपात तत्काळ तक्रार करावी .
**अमोल पाटील, सोयगाव**

**शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे :** शेतकऱ्यांनी परवानाधारक विक्रेत्याकडून खते, बियाणे व कीटकनाशकाची खरेदी करावी . खरेदीच्या वेळी बिलाची पक्की पावती घ्यावी . पक्की पावतीवर प्लॉट नंबर, वजन, बियाणे ज्या कंपनीचे आहे त्या कंपनीचे नाव, किमत आदींचा तपशील असावा . **कृषी सहाय्यक अर्जुन सुरडकर**

शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करतांना योग्य दक्षता घ्यावी, बियाणे खरेदी केल्यानंतर खरेदीची पक्की पावती सांभाळून ठेवावी . पकिटावरील छापील किंमतीपेक्षा जास्त पैसे देऊ नये . एचटीबीटी चे बियाणे हे नियमबाह्य आहे . त्यास परवानगी नाही हे बियाणे कुठे विक्री होत असेल व बोगस खत कुणी विकत असेल तर तात्काळ तालुका कृषी अधिकारी व कृषी अधिकारी पंचायत समिती यांना कळवावे . **एस .जी .वाघ, तालुका कृषी अधिकारी सोयगाव**



# बोनमॅरो प्रत्यारोपण शस्त्रक्रिया हे चॅलेंज : डॉ. टाकळकर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शुक्रवार, दि. १९ मे २०२३ रोजी दुपारी १.३० वा केअर सिग्मा हॉस्पिटल मध्ये नुकत्याच करण्यात आलेल्या बोन मॅरो प्रत्यारोपण शस्त्रक्रिया संबंधी माहिती देण्यासाठी पत्रकार परिषद संपन्न झाली, या पत्रकार परिषदेस केअर सिग्मा तर्फे डॉ. उन्मेष टाकळकर (मुख्य कार्यकारी संचालक), डॉ मनीषा टाकळकर (संचालिका) डॉ. अजय रोटे (वैद्यकीय अधीक्षक), डॉ. श्रुती तोष्णीवाल ( रक्त विकार तज्ज्ञ), मनोज रॉय (HCOO) हे उपस्थित होते, नुकत्याच काही दिवसांपूर्वी केअर सिग्मा हॉस्पिटलमध्ये जालना येथील एका ५५ वर्षांच्या महिलेवर बोन मॅरो प्रत्यारोपणाची यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली व ती यशस्वी सुध्दा झाली. सदरील महिला ही रक्ताच्या कर्करोगापासुन त्रस्त होती, किमोथेरपी व रक्ताचा कर्करोग बरा करण्यासाठी उपलब्ध असलेल्या सर्व प्रकारच्या वैद्यकीय थेरेपी करुन सुध्दा या आजारापासुन या रुग्णांस पाहिजे तो दिलास मिळत नव्हता, त्यामुळे केअर सिग्मामध्ये रक्तविकार तज्ज्ञ डॉ. श्रुती तोष्णीवाल व त्यांच्या टीमने 'ॲटोलॉगस स्टेमसेल' प्रत्यारोपण ज्याला बोनमॅरो प्रत्यारोपण असे म्हणतात हि आधुनिक तंत्रज्ञानाव्दारे यशस्वी शस्त्रक्रिया केली, व बहुतांश प्रमाणात या रुग्णाचा या आव्हानात्मक आजारापासुन दिलासा मिळवुन दिला, या पत्रकार परिषदेमध्ये सदरील महिला रुग्ण व त्यांचे नातेवाईक सुद्धा व्यक्तीशः उपस्थित होते, रुग्णांने या आजारापासुन झालेली उपचाराची सुरवात ते बोन मॅरो प्रत्यारोपण शस्त्रक्रिया होई पर्यंत झालेला आजाराच्या प्रवासाचे कथन करुन केअर सिग्माच्या टीम चे आभार मानले, रक्ताचा कर्करोग झाल्यानंतर बोनमॅरो शस्त्रक्रिया कशी केल्या जाते व त्याचे बरे होण्याचे प्रमाण किती आहे तसेच ही शस्त्रक्रिया झाल्यानंतर कुठल्या बाबींची खबरदारी घ्यावी लागते या बाबतची याची माहिती रक्तविकार तज्ज्ञ डॉ. श्रुती तोष्णीवाल यांनी दिली. पुणे, मुंबई, नागपूर या ठिकाणी अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया नेहमीच होता, परंतु मराठवाड्यात औरंगाबाद मध्ये केअर सिग्मा मध्ये बोन मॅरोची दोनदा यशस्वी पणे शस्त्रक्रिया झालेली आहे. बोन मॅरोची प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करणे हे अंत्यत महत्वाचे चॅलेंज आहे, अशी महिती पत्रकार परिषदेमध्ये केअर सिग्माचे मुख्य कार्यकारी संचालक डॉ. उन्मेष टाकळकर यांनी दिली, केअर सिग्माचे वैद्यकीय अधिळक्षक डॉ. अजय रोटे यांनी सुध्दा बोन मॅरो प्रत्यारोपण शस्त्रक्रिया व उपचाराबाबत थोडक्यात माहिती दिली.



# महाराणा प्रतापसिंह जयंतीनिमित शांतता समिती बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** हिंदवी सुर्य महाराणा प्रतापसिंह यांची जयंती तिथी उच्च नुसार जेष्ठ शुध्द -३ म्हणजे सोमवार( ता,२२ ) रोजी आहे,त्या अनुषंगाने पौलिस निरीक्षक संजय लोहकरे यांच्या उपस्थितीत पौलिस स्टेशन वैजापुर येथे शुक्रवार( ता.१९ )रोजी शांतता समिती सदस्य व उत्सव समिती पदाधिकारी यांची बैठक संपन्न झाली या बैठकित उपस्थितांच्या विनंती नुसार उत्सव समितीला काही अटी टाकुन परवानगी देण्यात आली. मिरवणूकित शांतता राखावी,रात्री दहा च्या आत मिरवणूक संपवावी,ठरलेल्या मार्गाने मिरवणूक न्यावी, व मिरवणूकीत सर्व जबाबदार पदाधिकारी यानी मिरवणूक विसर्जन पर्यंत उपस्थित रहावे या अधिन राहुन परवानगी दिली. प्रास्ताविक शांतता समिती सदस्य धोंडीरामसिंह राजपूत यानी करुन जयंती कार्यक्रम रुपरेषा सादर केली. नगराध्यक्षा शिल्पाताई परदेशी यानीही मिरवणूक शांततेत राहिल व शेवट पर्यत मिरवणूकीत राहू असे आश्वासन दिले,या प्रसंगी शांतता समिती सदस्य प्रकाश शेठ बोथरा, सदर काझी हाफिजोद्दीन ,भाजपा शहर अध्यक्ष दिनेश राजपूत, नगर सेवक गणेश खैरे राजपूत युवक क्षत्रीय संघटना चे धीरजसिंह राजपूत, सोनू राजपूत, प्रेम राजपूत,संजय राजपूत ,सागर राजपूत, गौरव दौडे,सागर सूरजमल राजपूत सम्राट राजपूत , डी. सिरसाट यांच्या सह उत्सव समिती सदस्य उपस्थित होते.





# सावळदबारा येथे खरीप हंगाम मशागतीला सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील परिसरात अवकाळी पाऊस सतत हजेरी लावत : असल्याने शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. सध्या पंधरा दिवसांपासून अवकाळी पाऊस थांबला असल्याने बळीराजा नव्या उमेदीने खरीप पेरणीपूर्व कामांना लागला असल्याचे क्षेत्र सावळदबारा परिसरातील चित्र दिसत आहे. गत खरीप व रब्बी हंगाम अतिवृष्टी व विविध रोगांमूळे शेतकर्यांच्या हाती लागला नाही. पाण्याची मुबलकता पाहून शेतकऱ्यांनी खरीप व रब्बी हंगामात जिवापाड मेहनत घेतली;परंतु यश पदरात पडले नाही. खरे पाहिले तर शासनाने आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मदत करायला पाहिजे होती, मदतही झाली परंतु नांदा, डाभा, देव्हारी, टिटवी, मोलखेडा,घाणेगांव तांडा, पिंपळवाडी, फर्दापूर व सावळदबारासह बरेच शेतकरी नुकसान भरपाई पासून आजूकही वंचित राहावे लागत आहे.

शासनाने नुसते आश्वासन देऊन बऱ्याच शेतकयांना आशेवर ठेवले . अतिवृष्टीची मदत सर्व शेतकऱ्यांना मिळेल, असे बऱ्याच क्षेत्र सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांना वाटले होते ; परंतु शासनाची मदत शेतकयांना मिळाली नाही . दरम्यान, शेतकऱ्यांनी यावर्षी देवणी सह आजूबाजूच्या परिसरातील गावागावांत उन्हाळी भुईमूग उन्हाळी सूर्यफूल, उन्हाळी सोयाबीन, ज्वारी आदी पिकांची लागवड केली आहे . मे महिन्यात अवकाळी पाऊस पडेल, असे शेतकऱ्यांना वाटले नव्हते, मात्र पावसाने मोठे नुकसान केले आहे . आता खरिपावर आशा असून, शेतकरी मशागतीच्या कामाला लागले आहेत .

सौ .लताबाई आबाराव कोलते शेतकरी सावळदबारा

# शेवगावचा तणाव निवळला, व्यापाऱ्यांचा बंद मागे

आधुनिक केसरी न्यूज

**निलकंठ कराड**

**शेवगाव :** येथे छत्रपती संभाजी महाराज जयंतीच्या मिरवणुकीवर रविवारी रात्री झालेल्या दगडफेकीच्या घटनेच्या निषेधार्थ शहरातील व्यापाऱ्यांनी दुकाने बंद करून बाजारपेठेतील सर्व व्यवहार बंद ठेवून दंगल प्रकरणातील आरोपींना त्वरित अटक करावी शेवगाव शहरातील अवैध धंदे बंद करावे, अतिक्रमण हटवा , जैन गल्लीतील जैन गल्लीतील अनधिकृत रिक्षा थांबा हटवा आदी मागण्यासाठी चार दिवसापासून बंद पुकारला होता मात्र आज अखेर चौथ्या दिवशी व्यापारी आणि पोलीस प्रशासन तसेच नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्या झालेल्या चर्चेनुसार व प्रशासनाने व्यापाऱ्यांच्या मागण्या मान्य करून त्वरित कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिल्याने सुमारे चार दिवस चाललेला बंद मागे घेण्यात आला. अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे उपविभागीय पोलीस अधिकारी संदीप मिटके, नगर परिषदेचे मुख्याधिकारी संदीप राऊत शेवगावचे पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या सोबत व्यापाऱ्याची झालेल्या चर्चेत कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी पुरेसा बंदोबस्त ठेवण्यात येईल तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात कायमस्वरूपी पोलीस बंदोबस्त ठेवण्याचे तसेच बेकायदेशीर कृत्य करणाऱ्यावर कडक कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिल्याने सुमारे चार दिवस कडकडीत बंद असलेले शेवगाव बाजारपेठेतील दैनंदिन व्यवहार शुक्रवारपासून सुरू करण्याचे जाहीर करण्यात आले आहे. शेवगाव शहरातील मुख्य रस्त्याच्या कडेला असलेली दुतर्फा अतिक्रमणे रहदारीसाठी नेहमीच अडथळा ठरत असून केवळ राजकीय पुढाऱ्यांच्या दबावामुळे अतिक्रमणधारकांना राजाश्रय मिळत असल्याने वारंवार वाहतुकीची कोंडी होऊ नये याकडे पोलीस प्रशासन, नगरपालिका व सार्वजनिक बांधकाम विभाग डोळेझाक करीत आहे रस्त्याच्या कडेला असलेल्या अतिक्रमणामुळे शहराची वाहतूक वारंवार ठप्प होत असून याचा फटका आबालवृद्धासह रस्त्याने प्रवास करणाऱ्या पादचारी, वाहनधारकांना मोठ्या प्रमाणात बसत आहे या वाहतुकीच्या कोंडीत अनेकदा रुग्णवाहिका अडकून रुग्णांचा अंत झाल्याच्या काही घटना ताज्या असताना तसेच वाहतुकीच्या कोंडीमुळे अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागल्याच्या घटनाही घडलेल्या असताना अतिक्रमण मोहीम सुरू झाल्याने शहराचा कोंडलेला श्वास मोकळा होईल.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर